# प्रकरण १ ले

# आधुनिक मराठी कादंबरी : उगम आणि वाटचाल

## प्रकरण पहिले

# आधुनिक मराठी कादंबरी: उगम आणि वाटचाल

### प्रस्तावना :-

एकोणीसावे शतक हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक पुर्नघटनेचे शतक आहे. महाराष्ट्र संस्कृती व मराठी वाङ्मयाच्या शाखोपशाखा यामध्ये फार मोठ्या प्रमाणात बदल घडून आले. मानवाच्या कर्तबगारीचे विविध क्षेत्रे असल्याने मानवी जीवनाचे खरेखुरे दर्शन घडवून आले. मराठी कादंबरी वाचकांच्या सुजान व बदलत्या अभिरूचीशी समांतर झाली. " मानव जीवन विषयक नव्या जाणिवा, इहवादी दृष्टीकोनातून समाजाच्या कानाकोपऱ्यात पोचविण्याचे साधन म्हणजे साहित्य होय."

वाङ्मयाच्या क्षेत्रात प्रवाहोप्रवाहाचे अतिशय मार्मिक दर्शन घडवण्याचे कार्य 'मराठी कादंबरी'या प्रकाराने केले असेच म्हणावे लागेल. या वाङ्मय प्रकाराचा चिकित्सक अभ्यास करणे आवश्यक ठरते. शिक्षणापासून वर्षानुवर्ष वंचित असलेल्या अज्ञानी समाजातील जनमनाची वैचारिक पुर्नबांधणी कादंबरीने केले. भाषेबद्दलचा अभिमान ज्ञानेश्वरांपासून मोरोपंतांपर्यंत वाङ्मय निर्माते करत आले तरी परकीयांच्या गरजेमुळे ऐतदेशीयांना त्यांच्याच भाषेत शिक्षण देऊन आपल्या उपयोगास येतील अशा समजूतीनुसार रामदासांच्या उक्तीप्रमाणे "जे जे आपणासी ठावे ते ते दुसऱ्याशी शिकवावे." याचप्रमाणे कार्याचा पाया रचला गेला. अव्वल इंग्रजांचा काळ लक्षात घेता ज्ञानलालसेमुळे एकमेकांपासून वेगळ्या असलेल्या ज्ञानक्षेत्रामध्ये उमेदीने प्रवेश केलेला दिसतो. पाश्चात्य विज्ञानकल्पनांचा देशी भाषेतून प्रचार करण्याच्या उद्देशाने ग्रंथनिर्मिती झाली. नव्या शिक्षणाच्या प्रथमावस्थेचा वाङ्मयीन दृष्टीने विचार करताना इंग्रजीसारख्या भाषेशी ओळख झाल्यानंतर आशय व अभिव्यक्तीच्या दृष्टीने इतर ज्ञानशाखांशी परिचय झाल्यानंतर, भाषेची उभारणी झाल्यावर सांस्कृतीक मुल्य प्राप्त झाले.

इंग्रजी राजटीमध्ये उदयास आलेल्या कादंबरी नव्या ललितलेखनावर संस्कृतशैलीची छाया पडलेली दिसते. इंग्रजीमधील 'नॉव्हेल' या प्रकाराचे मराठी नामकरण 'नावल' असे

योजिले. मोल्सवर्थ आणि कॅंडी यांनी इंग्रजी – मराठी, मराठी – इंग्रजी या कोषांनी अर्वाचीन कोश वाङ्‌मयाचा पाया घालून दिला. इंग्रजीतील अघाद ज्ञानाचे भांडार पाहून थक्क झाल्याने ज्ञानाचा परिचय व्हावा म्हणून ज्ञानप्रसाराला सुरूवात झाली. या कालखंडात अनेक वाङ्‌मयीन प्रवाह येऊन मिळाले. इंग्रजी पुस्तकांची मराठीमध्ये भाषांतर केली गेली. 'वाङ्‌मयीन व सांस्कृतीक' कार्यात वृत्तपत्रांइतकेच मासिकांनाही महत्व प्राप्त होवू लागले. गंभीर विषयाबरोबरच कथा, कादंबरी, नाट्य, काव्य या ललित वाङ्‌मयाला धुमारे फुटले. 'यमुनापर्यटन' या कादंबरीचा अपवाद वगळता स्वतंत्रनिर्मिती झाली असे म्हणता येणार नाही.

जीवनाचे आकलन व अवलोकन करण्याचा प्रयत्न कादंबरीकारांनी करून जीवन प्रवाहात जीवन सन्मुख करताना दिसतात. मराठी कथावाङ्‌मय, पंचतंत्र, इसापनीती या अवस्थेतून कादंबरी अवस्थेत येण्यास थोडा काळ जावा लागला. सत्यसृष्टीचे दर्शन घडविताना स्थळ, काळ, प्रसंगाची निवड करावी लागली. 'मानवी जीवन' सामग्री 'मानवी जीवन सुसह्य करणे' हे उद्दिष्ट कादंबरीचे आहे.

## आधुनिक मराठी कादंबरी वाङ्‌मयाचा उगम :-

"कादंबरी" सुपरिचित व लोकप्रिय असा गद्य साहित्यप्रकार असून कांदबरी हे कथानात्म गद्य असते या प्रदिर्घ साखळीत गुंफलेल्या कहाणी नीतिकथा, विज्ञानकथा साहसकथा, ठकांच्या चातुर्यकथा, रहस्यकथा, पुराणकथा हे प्रकार कथनात्म असून कादंबरी ही संज्ञासाहित्य प्रकाराला लावलीजाते तो मात्र पाश्च्यात्य वाङ्‌मयाच्या इतिहासात अठराव्या शतकात व मराठीत एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात निर्माण झाला असे मानतात."[१]

'कादंबरी' हा वाङ्‌मय प्रकार इंग्रजी राजवटीत जन्माला आला. गोष्ट सांगणे आणि ऐकणे ही मानवाची प्रवृत्ती पुरातन असून आख्याने, पुराणे, बखरी इ. ग्रंथातून आपणास जाणवते. "१८२९ मध्ये 'महाराष्ट्र भाषेचा कोष'या ग्रंथात कादंबरी या शब्दाचा अर्थ 'एक कल्पित कथा' असा आहे. सौ. कुसूमावती देशापांडे यांनी एका विशिष्ट तऱ्हेच्या कल्पित कथेला 'कादंबरी' हे नाव मराठीत बऱ्याच आधीपासून रूढ असावे."[२] असा तर्क केला निसर्गत:च कथेची आवड

असल्याने मुद्रणकलेच्या अभावी, पाठांतर करायला सुलभ म्हणून पद्य माध्यमांचा वापर केला अद्भूत कथेमध्ये हवेत चालणारी माणसे, सर्वगुणसंपन्न, सौंदर्यसंपन्न स्त्रिया, गुणगणालंकृत राजपुत्र, रामराज्य, अशा वेगवेगळ्या प्रकारच्या वस्तू अद्भूत सृष्टीत सापडल्या. अद्भूत कथेची उत्पत्ती लक्षात घेऊन मनुष्य त्याकडे वळला. या अद्भूत कथांचे ओघ ओसरल्यावर वास्तव सृष्टीचे चित्रण करणाऱ्या कादंबरी निर्माण होऊ लागल्या. कै. राजवाड्यांच्या मते, 'अगदी जुन्यात जुनी पश्चिम पृथ्वीवरील अक्षराने लिहिलेली अद्भूत कादंबरी म्हणजे यहुदी लोकांचा जुना करार होय.' हिंदुस्थानात प्राचीन काळात कथा लोकप्रिय असाव्यात बौद्ध धर्मग्रंथातील जातककथा युरोपीय वाङ्मयातील संतचरित्र ही उत्कृष्ट उदाहरणे आहेत. प्राचीन वाङ्मयामध्ये पंचतंत्र, हितोपदेश, वेताळपंचविंशी, सिंहासनबत्तिशी, असंभाव्य मनोरंजक कथा, कादंबरी, वासवदत्ता यासारख्या अद्भूतरम्य नवलकथा पहावयास मिळतात. प्राकृतमध्ये गुणाढ्याची 'बृहत्कथा' किंवा तिचे संस्कृतमधील रूपान्तर 'कथासरित्सागर' यासारखे लौकिककथासंग्रह निर्माण झाले. बाणभट्टाची 'कादंबरी' किंवा सुबन्धूची 'वासवदत्ता' यांचा येथे उल्लेख केला जातो. कादंबरीच्या वाङ्मयप्रकारामध्ये विशिष्ट तंत्र जरी यामध्ये न आढळले तरी कादंबरी लेखणाचे पूर्वेकडील प्रयत्न कादंबरीच्या विकसनात महत्वाचे स्थान आहे. इंग्लंडमध्ये सिडने, लिली नॅश यांच्या प्रयत्नानंतर कथालेखनाचे जे प्रयत्न झाले त्यात बनियनच्या 'पिलग्रिम्स प्रोग्रेस' स्थान उच्च आहे. डिफोने रॉबिन्सन् 'क्रूसो' (१७१९) ही कथा लिहिली.

संस्कृत कवी बाणभट्ट याने लिहिलेल्या 'कादंबरी' या नावाच्या अद्भुताने नटलेल्या प्रणयरम्य बाह्यकथेच्या नायिकेचे नाव कादंबरी होते तेच बाणभट्टाने कथेला दिले. 'नॉव्हेल' या शब्दाला 'कादंबरी' हा पर्यायी शब्द रूढ करताना अद्भूतरम्य, प्रणयरम्य कथा कादंबरीचे स्वरूप हा शब्द योजिणाऱ्याच्या मनात असावा. पाश्चात्य कादंबरी जन्माला आल्यानंतर 'नॉव्हेल' संबोधिले गेले. कादंबरी हे कथनात्म गद्य असते पण ते लिखित स्वरूपात असते. लिखित स्वरूपामुळे कथनाला आरंभ आणि अखेर असते. तोंडी सांगितलेली कथा एकच कथाकार सांगत असलातरी दरवेळी आरंभ आणि अखेर असते. तोंडी सांगितलेली कथा एकच कथाकार सांगत असलातरी दर वेळी आरंभ अंत वेगळा येऊ शकतो.

कादंबरीच्या कथनकाराची भूमिका फार महत्वाची असते. तो जरी दिसत नसला तरी त्याचे अस्तित्व सतत जाणवते. निवडलेल्या गोष्टीवर कृतीवर कथन करायचे तेवढे कथन करतो. कादंबरी एक निर्मिती असून दैनंदिन जीवनातली माणसे आणि कादंबरीतील पात्रे यांच्यातला फरक या निर्मितीमुळेच होतो. कलेच्या संबंधीच्या काही कल्पना अद्‌भूतरम्य पद्धतीच्या रचनेच्या बुडाशी असून कादंबरीला मिळालेल्या एका नावावून स्पष्ट होतो. 'रा. ब. का. ब. मराठ्यांनी आपल्या निबंधात गोवलेले 'नावल' हे नाव होय.' कथा आणि कादंबरी हे सर्वस्वी स्वतंत्र आणि भिन्न व प्रत्येकी स्वंयपूर्ण वाङ्मयप्रकार असून कथा व कादंबरीचे तंत्र निराळे असते. आरबी गोष्टी किंवा पंचतंत्र, हितोपदेश या पद्धतीच्या साखळीच्या रचनेची विपूलता आढळते. अनेक कादंबरीतून सुट्या कथांची सांधेजोड करण्याची पद्धत स्विकारलेली दिसते. मराठी कादंबरी ही कथेतून स्फूरलेली वाढलेली हे ऐतिहासिक सत्य नाकारता येत नाही.

**कादंबरीचे घटक :-**

१) ¥Th bD¥T:- " एखादे चित्र वा शिल्पकृती आपन पाहतो तेव्हा तिची पूर्ण आकृतीआपण पाहतो तेव्हा एकदम तिची पूर्ण आकृती व तिचे सर्वांगी आकलन होत नाही परंतु ही भाषिक कलाकृती असल्यामुळे तिचे आकलन होते तसे कादंबरी ही भाषिक कलाकृती असल्याले तिचे आकलन एकदम होत नाही. कादंबरीचे वाचन ही एक कालक्रम बद्ध प्रक्रिया आहे. त्यामुळे पात्रे, त्यांच्या कृती, प्रसंग आदी कादंबरीतल्या गोष्टीचे निवेदन कादंबरीतील काळाच्या अवकाशात करणे कादंबरीकाराला करणे भागच असते.कादंबरीतील कृती कोणत्या स्थलकालाच्या अवकाशात घडत आहेत, कादंबरीतील पात्रे काय करीत आहेत त्यांचे विचार काय आहेत हे कादंबरीकार सांगत असतो. या साऱ्याची जुळणी करणाऱ्या एकात्म घट्ट विणीलाच कथानक असे म्हणतात. "[३]

" एडमंड फॉर्स्टर " यांनी कथानक व हकीकत यामधील भेद स्पष्ट करताना एक गमतीदार उदाहरण दिले, "राजाच्या मृत्यूनंतर राणी वारली" ही एक संगतवार हकीकत झाली यात आपण 'दु:खाने' असा आणखी एक शब्द घातला तर त्यास आपण कथानक म्हणू शकतो."[४]

कथानक हा कथेचा आत्मा असून कथानकाच्या प्रारंभ, मध्य आणि शेवट या तीन गोष्टींचे

भान कादंबरीकार ठेवत असतो. कथानकाला गती देऊन वाचकाच्या मनात सातत्याने उत्कंठा निर्माण व्हावी म्हणून कथानक पुढे सरकत असते. कादंबरीत कथानकाइतकीची पात्रे महत्वाची असून ती पात्रे कृतीतून कथानकाला गती देतात. कादंबरीत कथानक आकर्षक होण्यासाठी संभाव्यता, कार्यकारणमीमांसा व कुतूहलनिर्मिती हे गुण आवश्यक असतात. कथानक हा एक प्रकारे कादंबरीचा गाभा असलेल्या कथाबीजाला कादंबरीत आकर्षक स्वरूपात प्रकट होणे शक्य नसते त्यामध्ये कथानकाची साखळी गुंफलेली दिसते. कथानकामध्ये आकर्षण वाढवून उत्कंठा टिकण्यासाठी वेगवेगळ्या कथावस्तूंची गुंफण करणे. एका घटनेकडून दुसऱ्या घटनेकडे वाचकांचे लक्ष नेऊन त्याची उत्कंठा जागृत करून ती कायम ठेवण्याचा प्रयत्न दिसतो. कथानक हे घटनांच्या आधारेच पूढे जात असते व या घटना पात्राकडून घडत असताना पात्राकडून घडणारा हेतू कादंबरीकाराच्या रचनेचा असून मानवाचे वर्तन, मानसशास्त्रीय, सामाजिक, तात्वीक स्वरूपाचे असल्याचे दिसते. उपकथानके मुख्य कथानकाइतकी स्वतंत्र, महत्वाची व विस्तृत असली तरी पसारा फार होण्याचा संभव असतो. कादंबरी हा महाकाव्याचा परंपरेतील असून त्यात मानवी जीवन व सामाजिक परिस्थितीचे चित्रण व्यापकपणे दिसून येते. "मोपॉसा" या प्रसिद्ध कादंबरीकाराचे अनुभवाचे बोल विचारणीय आहेत."जीवनात अनेक प्रसगांची व घटनांची गर्दी होते. काही घटना मारूतीच्या शेपटीप्रमाणे वाढत जातात व जीवनाचा एक मोठा भाग व्यापून घेतात पण कलाकृती अशा प्रकारची लांबण सौंदर्याच्या दृष्टीने मारक ठरण्याची शक्यता असते."[५] कथानक ही एक संरचना असून संरचना करण्यासाठी लेखक घटना प्रसंगांची निवड करीत आहे. कादंबरीच्या ऐतिहासिक विकासक्रम पाहत असताना पूर्वीच्या कादंबरीपेक्षा आजची कादंबरीची रचना बदललेली असून आरंभ मध्य, अंत हे कथानकाच्या रचनेचे विशेष दिसून येतात. प्रा. फडक्यांनी प्रतिभासाधनात कथानकाच्या विकासाच्या विलोम व अनुलोम पद्धतींचा उल्लेख केला आहे. अनुलोम पद्धतीत ज्या कालानुक्रमाने घटना घडल्या असतील त्या अनुक्रमानेच त्या वाचकांपुढे ठेवल्या जातात. गोष्ट आणि कथानक या दोन गोष्टीमधल्या फरकासंबंधी अलीकडे अधिक सविस्तर व सखोल विचार होत आहे. "रशियन रूपवाद्यांनी 'फॅब्यूला व स्यूयेत' या संज्ञा वापरल्या जीन हाल्पेरीन यांच्या 'थिअरी ऑफ द नॉव्हेल' मध्ये या संज्ञाचे सविस्तर

स्पष्टीकरण केले आहे. फॉर्स्टरच्या स्टोरी व प्लॉट या संज्ञापेक्षा फॅब्युला व स्युयेत या संज्ञांची व्याप्ती अधिक आहे. फास्टरने कार्यकारण संबंधावर भर देत स्यूयेन म्हणजे वाचकांसमोर असणारी सिद्ध झालेली रचनाअसा अर्थ अभिप्रेत आहे."[६] कादंबरीचे प्रत्यक्ष निवेदन होय.

२) स्वभावरेखन :-

मानवाच्या कुतूहलाचा आवडणारा विषय म्हणजे मानव कारण तो वेगवेगळ्या मानवाच्या स्वभावाचे , गुणधर्माचे आणि स्वत:च्या स्वभावाची तुलना करतो. मानवाच्या क्रियाप्रतिक्रियांच्या मागे कोणत्या मनोवृत्ती, भावनासंतती, विचारपरंपरा, प्रेरक असल्याचे ती जाणून घेऊन मानवी स्वभावांचे कोडे काल्पनिक उदाहरणे घेऊन आपल्या प्रतिभेच्या सहाय्याने विविध पात्रांद्वारे अंत:करण उघडे करून दाखवितो. "कथानकाच्या विकासात वाचकांना आनंद वाटण्यासाठी निरनिराळ्या प्रसंगी या व्यक्तीच्या स्वभावातील पैलूवर प्रकाश टाकून विलक्षण उत्कंठा व आकर्षण वाचकांना वाटते."[७] कादंबरीकार आपल्या प्रतिभाशक्तीचा उपयोग करून पुराव्याच्या आधाराने चित्र काढतो. तो आपणास अदृश्य सृष्टीचे दर्शन घडवतो. जगाच्या रंगभूमीवर जी पात्रे काम करीत त्याचे ही बाह्य दर्शन घडवतो.

३) पात्रे :-

कादंबरीकार पात्राचा जनक असल्याने कादंबरी कळते ती त्या व्यक्तीमुळे कादंबरी वाचत असताना पात्रे परिचीत होऊन विशिष्ट परिस्थीती वा घटनेत कशी वागतील याचा आपणास अंदाज येतो. आपण निर्माण केलेल्या पात्रांशी तादात्म पावून निरनिराळ्या प्रंसगामध्ये पात्राच्या कोणत्या भावना असतात याचा कल्पनेप्रमाणे अनुभव घेता येतो. त्यामुळे ती पात्रे जीवंत वाटतात. पात्राच्या मनोभावनांचे दिग्दर्शन वाचकांना करता येते. काही कादंबरीतील माणसे घटनेमुळे बदलतात आणि त्यांच्या स्वभावात परिवर्तन घडलेले दिसते. काही समर्थ असतात तर काही दुबळी काही ठिकाणी व्यक्तीच्या वर्तनासंबंधीचे आपले अंदाज चुकतात. "नवीन लेखकांत ही आत्मचित्रीकरणाची व स्वमत प्रदर्शनाची प्रवृत्ती बलिष्ट असते म्हणून त्यांची पात्रे कळसूत्री बाहुल्यांसारखी वाटतात."[८] कादंबरीतील पात्रे मनुष्यस्वभावाचे सामान्य नमुने खरे पण त्यांच्यात

वैशिष्ट्य हे असतेच आनुवंशीक संस्कार व परिस्थिती याच्यामुळे मनुष्यस्वभाव बनतो. मनोविश्लेषणाला योग्य ते महत्व दिल्यानंतर पात्रे जीवंत ठेवून वाचकाच्या नजरेसमोर साकार करण्याची कला काही साहित्यीकामध्ये दिसून येते. उदा. वि. स. खांडेकर, श्री. ना. पेंडसे कादंबरीकाराची निर्मिती असते. कादंबरीत पात्राचे विविध नमुने असतात. नायक नायिका, लहान मुले म्हातारी व प्रेमळ माणसे, खलनायक समजूतदार, सोशिक करारी, समंजस, बेरके इ. स्वभाव दिसून येतात. पात्राच्या स्वभावाचे चित्रण करत असताना कादंबरीकाराजवळ मानवी मनाचे, वर्तनाचे ज्ञान असणे आवश्यक असते. हे कौशल्य परंपरेतून मिळालेले ज्ञान, सामाजिक व्यवहार व मानसशास्त्राच्या अभ्यासातून व प्रतिभेच्या अंगभूत सामर्थ्याने, मिळते. "कादंबरीकाराची पात्राकडे पाहण्याची दृष्टी पात्रांवर खोल संस्कार करते तसेच सहृदयतेने, सहानुभूतीने, करूणेने, उपहासात्मक दृष्टीने कादंबरीकार पात्रांकडे पाहत असतो."[९] कादंबरीच्या कथानकात काय घडले हे सविस्तर सांगण्याऐवजी कादंबरीकारने पात्रचित्रणावर प्राधान्य देऊन पात्राला स्थिरावत ठेऊन वाचकाला त्याचा परिचय घडवून देणे. 'ओर्तेगा'च्या मते, कादंबरीचे कथानक वा कादंबरीतील कृती हे कादंबरीचे महत्वाचे घटक नसून कादंबरीत काय घडते याला महत्व नसून कादंबरीतल्या पात्रांचे जीवन त्यांचे अस्तित्व आणि त्या वातावरणात असतात. ते वातावरण यात कादंबरीचे खरे सत्व सामावलेले आहे.

प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष चित्रण करून चित्रणाव्दारे विशिष्ट पात्रांचे सर्वांगींण विविध दृष्टीकोणातून दर्शन वाचकांना घडवीत असतो.

**वातावरण :-**

"कादंबरीतील ही पात्रे इतरत्र वावरत असताना त्याच्या भोवताली एक विविध वस्तूंनी भरलेले जग असते. त्याला आपण वातावरण ॲटमॉसफिअर किंवा सेटिंग म्हणतो."[१०] कादंबरीमध्ये वातावरण हे कथानक व व्यक्तिदर्शन यांच्यातील रहस्य उलगडण्यास फार उपकारक होते. कादंबरीत स्थलकाळाची चौकट, सांस्कृतीक, भौगोलिक, परिसर, पात्रे वावरतात ती घरे, रस्ते हा सारा भाग वातावरणामध्ये येतो.

मराठी कादंबरीत वा.म.जोशीच्या युगानंतर कादंबरीकारांना भौगोलिक वातावरणाचे महत्व वाटल्याने वातावरण निर्मितीची कला वि.स. खांडेकरांनी कोकणाच्या पार्श्वभूमीवर कादंबरी लिहिल्या.वातावरणातून कादंबरीच्या सामाजिक,भौगोलिक ,सांस्कृतिक परिवेषाची कल्पना देणे हा वातावरण निर्मितीमागचा प्राथमिक उद्‌देश असतो.

एखाद्‌या कादंबरीतील घराचे वर्णन,कादंबरीतील व्यक्तीचा स्वभाव वर्णन त्याच प्रमाणे सांस्कृतिक, सामाजिक संदर्भावर प्रकाश टाकू शकते.वातावरणाचे पात्रांशी व त्याच्या कृतीशी जीवंत नाते असते.वातावरणानिर्मितीतून पात्रांच्या मन:स्थितीवर प्रकाश पडतो.एकच ठिकान सुसंवादी व विसंवादी असू शकते.काही कादंबरीमध्ये वातावरण इतके प्रभावी असते की कादंबरीतल्या नायकाची जागा घेताना दिसते.‘बनगरवाडी’ तील माणसे जितकी महत्वाची तितकीच त्या वातावरणानेच ती माणसे घडलेली दिसतात. प्रादेशिक कादंबरीत वातावरण निर्मिती हा घटक अतिशय प्रभावी असतो.

**भाषाशैली–**

भाषाशैलीला कादंबरीत स्वतंत्रस्थान असून विचार व भावना व्यक्त शब्दाद्वारे होत असतो.शैलीमुळे भाषेला लकब वजन प्राप्त होते.लेखकांच्या भाषाशैलीवर देशकाल परिस्थितीचा व त्याच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव पडत असतो.सहज सुंदरता व स्वाभाविकता हे उत्कृष्ट कादंबरीच्या भाषाशैलीचे गुणधर्म असतात.कथानक, पात्रचित्रण, वातावरण निर्मिती, स्वभाव रेखाटन प्रमाणेच भाषाशैली हाही कादंबरीचा एक महत्वाचा घटक आहे.भाषा आणि शैली यावर कादंबरीची परिणामकारकता अवलंबून असते.कादंबरीची भाषा आशयानूसार बदलत असताना पात्रांच्या स्वभाव वैशिष्ट्यानुसार शैली बदलत असताना दिसते. लेखकाच्या विवीध कृतीतून त्यांच्या विशिष्ट शैली आपल्या ध्यानात येऊन्न वि.स.खाडेकर, ना.सी.फडके, कमल देसाई,भालचंद्र नेमाडे,इ.लेखकांची विशिष्ट शैली त्यांच्या कादंबरीतून दिसते.

**निवेदन–**

कादंबरीमध्ये निवेदन कोणीतरी अज्ञात करत असताना स्वत:च्या दृष्टीतून घडलेल्या घटनांचे, पात्रांचे,त्यांच्या कृतीचे, पात्रांच्या स्वभावाचे चित्रण केले जाते.निवेदन म्हणजे घटणांची

मालिका असून सातत्य व सूत्र असते.क्रमानूसार तार्किक बांधणी केलेली असून ती कार्यकारण भावाने जोडलेली घटनांची साखळी असते.कादंबरीमध्ये कार्यकारण भाव असतो व त्यातही सूक्ष्मता असते.कादंबरीमध्ये काही ठिकाणी चित्रण व कथन असते कादंबरीचे निवेदन कधीकधी पात्राच्या तोंडून केले जाते.उदा. 'पण लक्षात कोण घेतो' ही वा.म.जोशींची कादंबरी पत्रात्मक असून त्यातील पात्रे एकमेकांना पाठवलेल्या पत्रातून निवेदन करतात.

**निवेदनाच्या दोन पद्धती आहेत–**

१) प्रथम पुरूषी निवेदन उदा.'पण लक्षात कोण घेतो' ,'यमू' या स्त्रीपात्राद्वारे केलेले निवेदन एका पात्राने केलेले असल्याने इतर पात्रांच्या चित्रणात एक प्रकारची तटस्थता निर्मान होते. स्वत:च्या मनाच्या गुंतागुंतीच्या विश्लेषणही हे पात्र कमीच करते मोठया गुंतागुंतीच्या आशयाच्या कादंबरीत निवेदकाला पाहता येत नाही असे प्रसंग किंवा इतर पात्रांची पत्रे डायऱ्या दोन पात्रांची आपसात चाललेली पण निवेदन करणाऱ्या 'मी' च्या कानावर पडलेली संभाषणे वापरली जातात. वि.स.खाडेकरांची 'ययाती','क्रौंचवध' या कादंबरीत आत्मनिवेदने दिसून येतात.

२) तृतीय पुरूषी निवेदन या प्रकारच्या निवेदनात निवेदक सर्वसाक्षी असून तो सर्वत्र संचार करताना पात्राच्या स्वभावाचे,त्याच्यामध्ये घडणारे संभाषण,घट्ना यांचे ज्ञान असल्याने मानवी स्वभाव गुंतागुंत मानवी मनाचे गुढ, निवेदकपद्धतीमुळे प्रकट होते.निवेदकाप्रमाने निवेदकाचा स्वर,लय,गती हे महत्वाचे घटक आहेत.लेखक तटस्थ असताना आपल्या पात्राविषयी सहानुभूती प्रकट करतो व ती प्रकट होवू नये म्हणून खबरदारी घेतो.अन्य पुरूषी भूमिकेवरून लिहिलेल्या कादंबऱ्यातही लेखक क्वचित स्वत:चे विचार मांडतो पण त्याचा कथानकावर कोठलाही परिणाम होवू देत नाही.

**आधुनिक मराठी कादंबरीचे स्वरूप व वैशिष्टये :–**

**ऐतिहासिक कादंबरी–**

१८६७साली रा.भि.गुंजीकर यांची 'मोचनगड 'ही मराठीतील पहिली ऐतिहासिक

कादंबरी लिहिली गेली ही कादंबरी 'विवीधज्ञानविस्तार' मधून क्रमश: प्रसिद्ध झाली. मोचनगडमध्ये गुजीकरांनी ग्रँड डफचा इतिहास निरनिराळ्या घटनांच्या स्थल,काल याचा वापर करून त्यांनी लिहिली.त्यानंतर १८६७ते १९२० या कालखंडात गुंजीकर,हरी नारायण आपटे,चि.वि.वैद्य, नाथमाधव यांच्या अनेक ऐतिहासिक कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या. पण नंतर च्या कालखंडामध्ये खंड पडलेला दिसून येतो."मराठ्यांचे पराक्रम, पेशवाईतील कारस्थाने, मोंगली व राजपूत संस्कृती या खाणीतली संपत्ती, जणू संपूण गेल्यामुळे ऐतिहासिक कादंबरीला सामग्री उरली नाही." असे उदगार कुसूमावती देशपांडेनी काढून " निर्मितीक्षम मनांना युगायुगाच्या मानवी जीवनातील विराट दर्शनाचे आकर्षण वाटेल व मराठी ऐतिहासिक कादंबरी प्रस्फूर्त होईल."[११] असे भाकित वर्तवले गेले."

ऐतिहासिक कादंबरीत इतिहास व कल्पकता यांचे संमिश्रण कमी-अधिक प्रमाणावर आपल्याला आढळते.बखरीपेक्षा ऐतिहासिक कादंबरीचे स्वरूप वेगळे असते.या कादंबरीत कल्पकतेला वाव असून ज्ञात असलेल्या ऐतिहासिक माहितीला रंजकता दिली जाते.ऐतिहासिक कादंबरीतील प्रत्येक व्यक्ति, विशिष्ट स्थलकाल व परिस्थितीशी बांधलेली असून काही व्यक्ति वाचकाला परिचित असतात.परिचिताहून वेगळे वर्णन केलेले असेल तर एकाद्यावेळी वाचक तक्रर करतो.परंत ऐतिहासिक कादंबरीत म्हणजे इतिहास नव्हे ही कथा आहे.'सूर्योदय'या कादंबरीच्या प्रस्तावनेत हरिभाऊ आपटेनी स्पष्ट केले होते. ऐतिहासिक कादंबरीमध्ये सत्यच सर्वत्र असेल तर इतिहासप्रसिद्ध व्यक्ति,इतिहासाची माहितीच मांडून त्यामध्ये नाविन्य वाटणार नाही.ऐतिहासिक कादंबऱ्याचा लेखक विशिष्ट कालखंडाचा भाष्यकार असल्याने इतिहासातील माहितीच्या आधारे कल्पनेच्या विविध छटा रंगवून तो त्या काळामध्ये रंग आणतो."सुप्रसिद्ध इतिहासकार श्री.ब.म.पुरंदरे, श्री.दांडेकरांच्या 'हर हर महादेव' च्या प्रस्तावनेत म्हणतात,"इतिहास बराचसा अबोल असतो अधून मधून बोलतो त्यामूळे गतकाळाचे सलग अखंड सुसंबंध चित्र आपल्या इतिहासातून विशेषत: शिवकालिन इतिहासातून लाभत नाही हे अस्पष्ट रंग व रेषा भरावयाचे कार्य ..........ललित या गद्यातून प्रभाविपणे मांडावयाचे कार्य या कादंबऱ्यानी केले."[१२] 'वज्राघात'मध्ये यादवाचे वैभव नष्ट का झाले किंवा 'स्वामी'तील

पेशवाईतील घटनांचे संशोधन करायला लागले तर इतिहासाला पूरक ठरणार नाही हरिभाऊ आपटेंच्यां 'गड आला पण सिंह गेला'या कादंबरीला जी धार आहे ती कोंडाणा किल्ला सर झाला या ऐतिहासिक घटनेमुळे नसून कमल कुमारीचे सतीत्व – रक्षण व घोरपडीच्या आधाराने किल्ला चढून जाण्याचा यशस्वी प्रयत्न, या रोमांचकारी प्रसंगामुळे होय.ऐतिहासिक कादंबरी ललित वाङ्मयाची शाखा असल्याने लेखकाच्या कल्पनाशक्तीला, प्रतिभेला, रचनाचातूर्याला, अशा कृतीत भरपूर वाव असतो.अशा कृतींचे रसग्रहण व मूल्यमापन या कसोट्यावर करणे योग्य असते. ऐतिहासिक कादंबरी व इतिहास यांच्यात मूलभूत फरक असुन इतिहास हा घडून गेलेल्या गोष्टींचे चित्रण करतो.कादंबरीकार एकापाठोपाठ प्रसंग घडत असल्याचे चित्रण करतो.भूतकाळ हा ऐतिहासिक कादंबरीमध्ये वर्तमानकाळा सारखा साकार होत असून दूरचे वास्तव वर्तमानासारखे न्याहाळलेले असते.ऐतिहासिक कादंबरी कोणत्या उद्देशाने लिहिली जाते यावर त्या कादंबरीचे स्वरूप अवलंबून असते.१९व्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रीयांच्या मनात निर्माण झालेल्या राष्ट्रीय प्रेमाच्या भावनेतून राष्ट्राचा इतिहास व संस्कृती यांच्या बद्दल आदर व अभिमान व्यक्त करण्यची स्फूर्ती लेखकाला मिळाली प्राचीन भारताचा गौरव व पारतंत्र्याविषयीचा राग, टिळकांचे लढावू राजकारण, जुने तत्वज्ञान, धर्म, परंपरा, आपला इतिहास किती उज्वल आहे पारतंत्र्याच्या जाणिवेने मरगळून पडलेल्या समाजाला तीनशे वर्षापूर्वीच्या शिवकालिन राष्ट्रप्रेमाने भारावलेले वातावरण सामान्यातला सामान्यही राष्ट्रीयत्त्वाने शौर्याने थरारुन टाकायला लावणारे तेजस्वी नेतृत्व यांची चित्रे रंगविणे १९व्या शतकातील ऐतिहासिक कादंबरीला आवश्यक वाटले. राजपूत,शिवशाही इतर पराक्रमी भारतीयांच्या इतिहासातील व्यक्ती, त्याचा काळ, पराक्रम हे ऐतिहासिक कादंबरीचे वैशिष्ट्य आहे. ह.ना.आपटेंची 'वज्राघात'ही अपवादात्मक कादंबरी आहे . घटना व व्यक्तीवर लक्षकेंद्रीत न करता मानवीमन, व्यापार, प्रेम, वासना, पिपासू, राग, लोभ, सूड, आसक्ती, माया या भावनांचे नाट्यपूर्ण चित्रण कल्पित व समकालीन पात्रप्रसंगा ऐवजी ऐतिहासिक व्यक्ती स्थळे निवडली.

हरिभाऊच्या 'वज्राघात' पेक्षा रणजित देसाई यांच्या 'स्वामी' ने वेगळी प्रेरणा दिल्याचे दिसते १९२०–४७या कालखंडामध्ये गुणवत्तेच्या दृष्टीने ऐतिहासिक कादंबरी खालावल्याचे

वाटते. ऐतिहासिक कादंबरीलेखन करत असताना ऐतिहासिक काळात गुंतून जावून विशिष्ट भावस्थिती व वृत्तीविशेष आवश्यक वाटतो. ना.सी. फडक्यांनी 'अल्ला हो अकबर' च्या रूपाने ऐतिहासिक वातावरणाचा वास्तवभास निर्माण करून कादंबरी लिहिली.

"नाथमाधवांनी 'सावळ्या तांडेल' ही ऐतिहासिक कादंबरी शिवशाहीवर लिहून लौकिक मिळविला होता."[१३] हडप यांनी शिवशाही व पेशवाईवर कादंबरी लिहिल्या त्याच्या कादंबरीमधून ऐतिहासिक वातावरण निर्माण करण्यावर भर अधिक दिसून येतो. वि.वा. भिडे यांनी शिवाजी महाराजांच्या काळावर सात कादंबऱ्या लिहिल्या 'मुरारी, कजळगडचा कब्जा, तिसरा कोण, शिवाजीचा उजवा हात,' इ.लक्ष्मण जोशी यांची 'मराठेशाहीची ढाल' (१९२५) 'विजयी तलवार' (१९३४) या कादंबरीमध्ये शिवाजीच्या पराक्रमाचे भक्तिपुर्वक वर्णन केले असून 'अस्तोदय' शिवाजीराजांचा मृत्यूचे व संभाजीचा राज्याभिषेक यांचे दर्शन घडवले आहे. सरस्वती कुंभार यांची 'मराठ्यांची मुलगी' १९२० मध्ये यशोदाबाई भट यांनी 'राजमाता जिजाबाई' यात कर्तृत्ववान आई चित्रण करून आदर प्रकट केला आहे. "गो.गो.मुजूमदार यांनी लिहिलेल्या 'पौर्णिमा' 'पुर्वरात्र' (१९३१) 'मराठ्यांचीअखेर' (१९३२) 'मराठेशाहीचा वक्षपक्ष '(१९३५) या कादंबऱ्या भारदस्त असून ऐतिहासिक आधाराने लिहिलेल्या आहेत. अ.प. भांडारकृत 'मराठेशाहीची मुहूर्तमेढ' (१९४२) या दोन कादंबऱ्याबरोबर न.चि. केळकरांची 'कोकणचा पोर' (१९४२) या कृती केवळ साहित्यसम्राटाची कादंबरी म्हणून उल्लेख करायचा असे चंद्रकांत बांदिवडेकरांना वाटते."[१४] ऐतिहासिक कादंबरी कोणत्या उद्देशाने लिहिली जाते यावर त्या कादंबरीचे स्वरूप अवलंबून असते. एकोणीसाव्या शतकाच्या उर्त्तरार्धात महाराष्ट्रीयाच्या मनात निर्माण झालेल्या राष्ट्रीय प्रेमाच्या भावनेतून राष्ट्राचा इतिहास व संस्कृती याच्याबद्दल आदर व अभिमान व्यक्त करण्याची स्फूर्ती लेखकाला मिळाली. "प्राचीन भारताचा गौरव व पारतंत्र्याविषयीचा राग टिळकांच्या लढावू राजकारण जुने तत्वज्ञान धर्म व परंपरा आपला इतिहास किती उज्ज्वल आहे . पारतंत्र्याच्या जाणिवेने मरगळून पडलेल्या समाजाला तीनशे वर्षापुर्वीच्या शिवकालीन राष्ट्रप्रेमाने भारलेले वातावरण सामान्याच्या सामान्यालाही राष्ट्रीयत्वाने शौर्याने थरारून टाकायला लावणारे तेजस्वी नेतृत्व यांची चित्रे रंगविणे एकोणिसाव्या शतकातील

ऐतिहासिक कादंबरीकाराला आवश्यक वाटले. राजपूत,शिवशाही इतर पराक्रमी भारतीयांच्या इतिहासातील व्यक्ती त्याचा काळ, पराक्रम हे ऐतिहासीक कादंबरीचे वैशिष्ट्य आहे. ह.ना. आपटेची 'वज्राघात' ही एक अपवादात्मक कादंबरी आहे. घटना व व्यक्तिवर लक्ष केंद्रित न करता मानवीमन, व्यापार, प्रेम, वासना, पिपासु, राग, लोभ, सुड, आसक्ती, माया भावनाचे नाट्यपुर्ण चित्रण काल्पित व समकाळी पात्रप्रसंग ऐवजी ऐतिहासिक व्यक्ति स्थळे निवडली. हरिभाऊंच्या व्रजाघातापेक्षा रणजित देसाई यांच्या स्वामी ने वेगळी प्रेरणा दिल्याचे दिसते. १९२० – ४७ या कालखंडामध्ये गुणवत्तेच्या दृष्टीने ऐतिहासिक कादंबरी खालावल्याचे वाटते. ऐतिहासिक कादंबरीलेखन करत असताना ऐतिहासिक काळात गुंतून जाऊन विशिष्ट भावस्थिती व वृत्तीविशेष आवश्यक वाटतो. ना.सी.फडकेंनी 'अल्ला हो अकबर' च्या रूपाने ऐतिहासिक वातावरणाचा इतिहासकालीन वास्तवाची जीवंत अनुभूती देण्यासाठी काही कादंबरीकार ऐतिहासिक काळाची भाषा, पोषाख, आचार, परिसर इत्यादी तपशिलांचा सहेतूक व जाणीवपुर्व कटाक्षाने वापर करतात स्वामी मध्ये ही पद्धत दिसून येते. ऐतिहासीक व्यक्तींना केंद्रस्थानी ठेवून चांगल्या ऐतिहासिक व्यक्तींना केंद्रस्थानी ठेवून चांगल्या ऐतिहासिक कादंबरी लिहिता येतात. ना.स.इनामदार, रणजित देसाई ,स्वामी, झुंज, झेप व मंत्रावेगळा यातून सोदाहरण दिले आहे. कादंबरीकार ऐतिहासिक काळाची भाषा, पोषाख, आचार, परिसर इ. तपशिलांचा सहेतुक व जाणीवपुर्वक कटाक्षाने वापर करतात. स्वामी व त्यानंतरच्या कादंबरीमध्ये दिसून येते. व्यक्ती, तिच्या कृती तिच्या भोवतालची माणसे, त्यांचे परस्पर संबध क्रियाप्रतिक्रिया यासाऱ्यांच्या चित्रणातून एक अर्थपूर्ण स्वयंपूर्ण आणि सुसूत्र अशी रचना करण्यात कादंबरीकार यशस्वी झाला आहे.

मराठीमध्ये चरित्रपर ऐतिहासिक कादंबरी लिहिण्याची परंपरा श्री रणजित देसाई 'श्रीमान योगी'तून घडविलेले दिसते. ऐतिहासिक कादंबरी कोणत्या उद्देशाने लिहिली जाते यावर त्या कादंबरी काराचे स्वरूप ठरते. एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रीयांच्या मनात निर्माण झालेले राष्ट्रीय प्रेमाच्या भावनेतून राष्ट्राचा इतिहास व संस्कृती या बद्दलचा आदर व अभिमान व्यक्त करण्याची स्फुर्ती लेखकांना मिळाली. नाथमाधव व श्री हडप यांनी ऐतिहासिक कादंबरीकार

ऐतिहासिक कादंबरीकार या नात्याने केलेली कामगिरी मराठी साहित्याच्या बुद्धीपरस्पर इतिहासकाळाचे वर्णन करून देशबाधवांना सन्मार्ग दाखविण्याचा प्रयत्न काही कादंबरीमधुन दिसून येतो. छत्रसाल वालचंद शहा 'वसईचा रणसंग्राम' सी.के. दामले 'शापित महाराष्ट्र' सहकारी कृष्ण या सर्व कादंबरीमधून उल्लेखनीय मानाचे स्थान असणारी भारताचर्य चिंतामणराव वैद्य यांच्या 'दुर्दैवी रंगू' (१९१४) या कादंबरीस द्यावा लागेल. हौस किंवा नावीन्यता म्हणून काही लेखकांनी ऐतिहासिक कादंबरी लिहिल्या त्यात श्री. चिं. गं. भानू 'शृंगेरची लक्ष्मी' (१९३४) श्री.वि.वा. भिडे यांची 'कोरलाईचा किल्लेदार' (१९२४) अ.ब. कोल्हटकर यांची 'इंग्रजांचा पराभव' तात्यासाहेब केळकर यांची 'बलिदान' (१९३७) श्री. ल.ग. वझे 'बंधमुक्ता' या कादंबरी उल्लेखनीय आहेत. तसेच स्त्री लेखिका स्त्री जीवनविषयक प्रश्न हाताळताना ऐतिहासिक कादंबरी लिहिलेल्या दिसून येतात. 'साम्राज्यासाठी' (१९३१) 'चितोडचा चंदू' (१९३६) सौ. शांताबाई नाशिककर, सौ. आनंदीबाई जयवंत व कुमूदिनी रांगणेकर यांचा उल्लेख करावा लागतो. या काळामध्ये लिहिलेली र.वा. दिघेची 'गानलुब्ध्दा मृगनयना' (१९४७) ही प्रणयकथा असून त्या काळाच्या वाचकांच्या अभिरूचीनूरूप असल्याचे दिसून येते. ऐतिहासिक व्यक्तींची इतिहासाने जनमानसात रूजवलेली प्रतिमा पुसून टाकून तिचे उदात्तीकरण करण्याचा हेतू असला म्हणजे कादंबरी चरित्रात्मक ठरते. ना.स. इनामदार यांच्या 'झुंज' 'झेप' 'मंत्रावेगळा' भीमराव कुलकर्णी यांची 'ओंकार' या कांदबरींना चरित्रात्मक वळण मिळालेले दिसते. कादंबरीतील ऐतिहासिक घटनांचे निवेदन रंगदार व व्यक्तिदर्शन उठावदार असले तरी ऐतिहासिक दृष्ट्या उत्कृष्ट असे म्हणता येणार नाही.

"ऐतिहासिक व्यक्ती व घटना यांना कादंबरीत केंद्रस्थान प्राप्त झाले की साहित्य बाह्य मुल्यांना रसग्रहणात अकारण महत्व येते. तसेच श्री.स.शं. देसाई यांची महादजी शिंदेच्या जीवनावर 'चंबळेच्या पलीकडे' (१९६८) कै. बेलवलकर यांची 'शर्थीने राज्य राखिले' (१९६८) या कादंबरीतून ऐतिहासिक व्यक्तिंना व घटनांना प्राधान्य दिले आहे. श्री. मनमोहन नातू यांच्या 'बाजीराव व पानपत' १९६८ या कादंबऱ्यांतही प्रणयकथा असून व्यक्तींना प्राधान्य दिले आहे."[१५]

मराठीतील एक सिध्दहस्त लेखक री.गो.नी. दांडेकर यांची ऐतिहासिक कादंबरीच्या क्षेत्रात मोलाची कामगिरी केली. (१९६६)'बया दार उघड' 'हर हर महादेव' या कादंबरी प्रकाशित झाल्या "बया दार उघड" च्या प्रस्तावनेत श्री.ब.मो. पुरंदरे यांनी दिलेला अभिप्राय उल्लेखनीय आहे. या कादंबरी गोतसभा दिसेल, लोकांची वतनप्रियता, सुलतानी राजवट दिसेल, सामाजिक संकेत, मानापमान, निष्ठा, परस्परसंबंध रीतिरिवाज उमगतील. तत्कालीन सांस्कृतीक जीवनाचीही ओळख घडेल, त्यावेळची हत्यारं, वस्त्रं......... औषधं, देवस्थानं, किल्ले, वाडे, बांधकाम, खेडी, सरकारी कामकाज, न्यायनिवाडे वैगरे अनेक गोष्टींचा तपशील अगदी नेटक्या वास्तवतेने अप्पासाहेबांनी भरलेले आहे. ऐतिहासिक कादंबरीमध्ये हरिभाऊ , नाथमाधव व हडपांच्या बद्दलचा विश्वास वाटतो. "[१६]

इतिहासाकडे व ऐतिहासिक व्यक्तिंकडे आधुनिक दृष्टीकोणातून पाहिले जात असते. कादंबरीकार स्वत:चे विचार, स्वत:चे दृष्टीकोण इतिहासकालीन व्यक्तीवर लादतो.'स्वामी' कादंबरीव्दारे रणजित देसाई यांनी ऐतिहासिक कादंबरीच्या क्षेत्रात नाविण्य आणून इतिहास प्रसिध्द पुरूषालाच केंद्रस्थान दिले 'उषा:काल' 'स्वराज्याचा श्रीगणेशा' आदी कादंबऱ्यांमध्ये शिवछत्रपतींचया कार्याबद्दल आदर असणारे लेखक दिसतात. १९६८ ला निर्माण झालेली 'श्रीमान योगी' या कृतीचा गौरवाने उल्लेख केला आहे.

इतिहास ही कल्पित गोष्ट नसून ती घटित आहे. पेशवेकालामध्ये पानिपतच्या युध्दानंतर वैयक्तिक महत्वाकांक्षेने आंधळे झालेल्या समाजहिताची पर्वा न करणाऱ्या स्वार्थी व सत्तालोलुप व्यक्ती त्यांचे राजकीय डावपेच, शिवकाळापासून पोखरली गेलेली शतश: तुकड्याचा हा इतिहास आहे. या इतिहासाचे अपरिहार्य पर्यवसान येत गेलेल्या ऐतिहासिक घटनेतून प्रत्ययाला येते. नारायण रावांचा, खून बारभाईचे कारस्थान, सवाई माधवरावांची आत्महत्या, ज्याला विनासायास पेशवेपद प्राप्त झाली त्या दुसऱ्या बाजीरावाचे धुंद विलासी वागणे आणि पेशवाईची अखेर हा एक अपरिहार्य असा ऐतिहासिक क्रम आहे. "सामाजिक प्रवृत्ती ची दिशा व वळणे तिच्यातून दृग्गोचर होत असतात. ऐतिहासिक कादंबरीकार ऐतिहासिक काळ व युगधर्म प्रामाणिकपणे उभा करतो."[१७]

**पौराणिक कादंबरी –**

ऐतिहासिक कादंबरीप्रमाणेच मराठीमध्ये पौराणिक कादंबरी लोकप्रिय होत आहे. पौराणिक कादंबरी हा ऐतिहासिक कादंबरीचा एक भाग आहे. व्यक्ती किंवा प्रसंग, स्थळे यांच्याविषयी माहिती उपलब्ध करून देणारी साधने नसतात.पौराणिक कादंबरीत संपूर्णपणे कल्पनेच्याच आधारे व्यक्ती वा स्थळे यांचे उल्लेख सोडता निर्माण केली जाते. सुखवादी रोमॅंटिक वृत्तीमुळे एका बाजूने स्वप्नाळ सामाजिक चित्रे काढण्यात रमली असताना कल्पनाशक्ती हा एकांगी अविष्कार होता. कलात्मक महाकाव्य प्रतिभेनी स्फुरलेली असतात. व ऐतिहासिक महाकाव्ये ऐतिहासिक आधाराने येतात. महाकवीजवळ प्रतिभाशक्ती असल्यामुळे समाजजीवनाचे कलेले चित्रण प्रत्ययकारीअसल्यामुळे निवेदिलेल्या घटनांचा जनमानसावर पगडा बसला त्यामुळे महाकाव्यातील सर्व घटना लोकांना विश्वसनीय वाटू लागल्या. "आधुनिक जीवनामुळे प्रश्न व नाट्य पौराणिक कथांच्या व्दारा रूपकात्मक पद्धतीने सांगून प्रेक्षकांना उल्हासित केले."[१८]

पौराणिक कादंबऱ्यांना 'ययाति' या कादंबरीच्या निर्मितीने लोकप्रियतेने विशेष बहर आला. १९५९ साली प्रसिध्द झालेल्या ययाति कथेला आधुनिक मानवाच्या भोगलोलुपतेचा प्रतीकात्मक अर्थ देण्याचा प्रयत्न दिसतो. 'मृत्यंजय' कादंबरीतून शिवाजी सावंत यांनी कर्णाच्या व्यक्तिरेखेला व तिचे उदात्तीकरण करून न्याय देण्यासाठी पुराणे ,महाकाव्य, अद्‌भुतरम्य, कल्पनारम्यकथा नसून त्याच्या निर्मितीमागे सार्वकालीन असा नैतिक व सामाजिक मुल्यविचार असतो. पाप–पुण्य, धर्म– अधर्म याचा विचार करून समाजनियम व समाजदर्शन घडविणे. हा पुराणांमागचा उद्‌देश असतो. ना.के.बेहरे यांनी वाकडे पाऊल पडणाऱ्या स्त्रियांबद्‌दल मानुसकीयुक्त कळवळा बाळगावा या उद्‌देशाने 'अहिल्योध्दार' (१९२९) लिहिली.

'आश्रमहरिणी' मध्ये वा.म.नी पौराणिक वातावरणाच्या माध्यमातून आधुनिक आशय व्यक्त करण्याच्या प्रयत्नात पौराणिक स्मृतीकडे वळून पाहत नाहीत. पुराणातील प्रसंग व व्यक्ती प्रतीकात्मक असतात. त्यांचे आवाहन सार्वकालिक असतात. ऐतिहासिक कादंबरीप्रमाणेच पौराणिक कादंबरीने सामाजिक व सांस्कृतिक जगणाऱ्या मानवी आयुष्याचे आकलन व्यक्त

करावयाचे असते. म्हणून पौराणिक कादंबरी निर्माण झाली नाही असे वाटते. वातावरणातील निर्मिती, भाषा, शिष्टाचार, परिसर यांची वर्णने कौशल्यावर अवलंबून असतात.

ऐतिहासिक व पौराणिक कादंबऱ्या या चरित्रपर कादंबरीवर जात आहेत. श्री. गो.नी. दाण्डेकर यांची 'अजुन नाही जागं गोकूळ' (१९६३) ही कादंबरी उल्लेखनीय आहे.'कर्णायण'१९६२ श्री. आनंद साधले यांची 'महापुरूष' १९६९ या कांदबरी कर्णाच्या जीवनावर आधारित आहेत. 'स्वामी' कादंबरी प्रमाणेच 'राधेय' ही कादंबरी रणजित देसाई यांनी लिहिली.

**राजकीय कादंबरी –**

ऐतिहासिक कादंबरीत ज्याप्रमाणे ऐतिहासिक पार्श्वभूमीला महत्व असते. तसेच राजकीय पार्श्वभूमीला महत्व असल्याने राजकीय घटनांना ऐतिहासिक महत्व येते. राजकीय कादंबरी म्हणजे ज्या कादंबरीमध्ये राजकीय घटना व व्यक्तीचे जीवनाचित्रण येते. "राजकीय कादंबरी म्हणजे ज्या कादंबरीमध्ये राजकीय कल्पनांचा वा राजकीय वातावरणाचा वापर प्राबल्याने ठळकपणे केलेला असतो. ती कादंबरी राजेरजवाडे, दरबार सरकारी कामकाज मंत्रिमंडळ असे राजकारणाशी संबंधीत असतो किंवा राजकारणाची चर्चा करणारे पात्रे ज्या कादंबरीत असतात तिला राजकीय म्हणणे राजकीय शब्दाचा अर्थ संकुचित करणे होय. पात्रे राजकीय असल्याने कादंबरी राजकीय ठरत नाही."[१९] राजकीय घटनांमुळे पात्रांच्या जीवनात ज्या क्रिया प्रतिक्रिया होत असतात त्याचे चित्रण करून लेखकाने तत्कालीन जीवनावर प्रकाश टाकला तर अशा कादंबरी राजकीय सदरात मोडतात. राजकीय कादंबरीत अतंर्गत ताण असून मानवीवर्तन व भावना यांचे चित्रण असते. मानवी भावना नितीमत्ता हे मूर्त अनुभव असतात मूर्त अमूर्त यांचा सघंर्ष होवून त्यात राजकीय कादंबरीत विलक्षण भावनाट्य तयार होते.

"राजकीय कादंबरीमध्ये जीवंत व्यक्तींना पात्रे कल्पून निर्वीकारपणे त्याचे स्वभावरेखन करणे अवघड असते म्हणून समकालीन राजकीय पुढारी कादंबरीत पात्रांच्या रूपाने अवतरले तरी त्यांना मुखवटे घातलेले असतात. विद्यमान व्यक्तींचे स्वभाव धर्म त्याच्या जीवनातील घटना निसंकोचपणे दाखविणे सुलभ नसते."[२०] आणि विकास कादंबरीमध्ये राजकारण हा घटक किती

आहे याची चिकित्सा करून एखादी कादंबरी राजकीय आहे की नाही हे ठरवावयाचे झाल्यास वेगवेगळ्या कादंबऱ्याची उदाहरणे समोर ठेवावी लागतील उदा. ना.सी.फडके यांची 'प्रवासी' माडखोलकरांची 'कांता' अरूण साधु यांची 'सिहांसन'यामध्ये राजकारणाचे प्रमाण वेगवेगळे आहे. विसाव्या शतकामध्ये भारतात स्वदेशविषयीची लाट उसळली निबंध, काव्य, चरित्र, नाटकइत्यादी व्दारा लोकांच्या आशा-आकांक्षा प्रकट झाल्या. त्यामुळे कथावाङ्मयामध्ये राजकीय आंदोलनाचे पडसाद उमटले हरिभाऊंच्या 'मी'(१८९३) 'यशवंतराव खरे'(१८९५) या कादंबरीमधुन स्वदेश, स्वातंत्र्य ची तळमळ दिसते. वा.म. जोशींच्या हे तत्वचिंतक प्रवृत्तीचे असूनही त्याच्या कादंबरीमधून राजकारण डोकावताना दिसते.

रशियामधील साम्यवादाकडे आपल्या देशातील तरूण आकर्षीत झाले त्याच्या विचारसरणीचा प्रभाव पडला 'मुक्तात्मा' (१९३३)'शाप'(१९३६) 'उल्का' (१९३४) इ. कादंबरीमध्ये दिसतो. मराठीतील पहिली राजकीय स्वरूपाची कादंबरी श्री दत्ता आप्पाची तुळजापूरकर यांची 'माझे रामायण' (१९२७) ही होय. माडखोलकरांची 'मुक्तात्मा' (१९३३) ही मराठी भाषेतील उत्कृष्ट राजकीय कादंबरी होय. प्रा. कुसूमावती देशपांडे या 'धावता धोटा' या कादंबरीस प्राधान्य देतात. ना.के.बेहरे यांनी 'ध्येयाकडे' (१९३४) ध्येयवादी सृष्टीचे वर्णन करून लेखकाने तत्कालीन राजकीय प्रश्नावर चर्चा केली आहे. सावरकारांना 'काळेपाणी'(१९३६) ब्रिटीश राजवटीत क्रांतीकार अंदमानमध्ये भोगलेल्या हालअपेष्टांची ह्दयद्रावक गाथाच गायिली आहे. १९२० नंतर कादंबरीच्या आधारे घटना जीवंतपणाचे चित्र फडके यांनी उभे केले. 'शोनान', 'अस्मान', 'तुफान', मधून राजकीय घटना, चळवळ, राजकीय प्रवृत्ती, उत्तम प्रयत्न देताना दिसतात.

"खांडेकराची 'क्रौचवध'यामध्ये राजकारण आलेले असून राजकारण व्यक्तीच्या सुखद:खाचे चित्रण फिके पडलेले दिसते."[२१] राजकीय कादंबरी असा अभिमान बाळगावी अशी कृती मिळाली नाही. श्री.पु.भा. भावे 'आग' (१९६१) 'चोरांचा बाजार'(१९६३) 'दर्शन'यामध्ये सामाजिक प्रश्न असले तरी त्यामधील राजकीय पार्श्वभूमी लक्षात घेण्यासारखी वाटते. क्रांतिकारकाच्या जीवनातील स्वातंत्र्योत्तर कालातील अनुभवाचे सार श्री. भावे यांच्या

कादंबरीतून प्रत्ययास येते. चोराचा बाजार मधून आजच्या राजकीय जीवनाच्या प्रतिक्रिया तरूण पिढीवर कसा परिणाम करतात. याचे दर्शन घडते. श्री. दा.वि. जोगळेकर यांच्या 'तरीच जन्मायावे'(१९६४) सामाजिक व नैतिक अधोगती दिसते. श्री मानोहर शहाणे याच्या 'झाकोळ' (१९६५) कादंबरीत राजकारण डोकावते श्री भाऊ पाध्ये यांनी 'डोंबाऱ्याचा खेळ'(१९६०) कामगार चळवळीतील गोंधळ, कामगार पुढाऱ्याचे खाजगी जीवन, हेवेदावे याचे यथार्थ चित्रण आढळते. नव्या युगात राजकीय कादंबरीचे स्वरूप जुन्या युगातील राजकीय कादंबरीपेक्षा वेगळे होते. "जुन्या कालखंडामध्ये वैशिष्टिपूर्ण घटनांनी स्वातंत्र्यप्राप्तीच्या तळमळीने राजकीय कादंबरीला प्रेरणा मिळाली."[२२] राजकीय कादंबरी ही राजकीय असली तरी कादंबरी म्हणून तिचे मुल्यमापन करताना त्या कादंबरीत कोणता प्रकाश टाकून आपल्याला नैतिकदृष्टी दिली हे महत्वाचे ठरते.

"राजकीय कादंबरीमागे अस्सल अनुभूतीचे असणे आवश्यक असते. राजकीय हालचाली डावपेच तत्वविचारांचे आचरण व उल्लंघन कल्पनेवर विश्वास ठेवून सत्याचा देखावा करणारे चित्रण होत नाही."[२३] पु.य. देशपांडे यांचा पिंड राजकीय जीवनातील आवड असणारा दिसत नाही त्यांना तात्वीक विचारांची आवड दिसते. विशाल जीवनामध्ये तत्वशील सामाजीक जीवनात एकरूप झाले पाहिजे तसेच 'काळीराणी' तून स्त्रिच्या व्यक्तित्व विकासासाठी परंपरागत समाजिव्यवस्था मोडून समाजवादी समाजरचना करायला हवी. 'नवेजग' मध्ये वैश्विक राजकारणाचे प्रतिकात्म चित्रण आहे. माडखोलकरांच्या "शाप, कांता, मुखवटे, दुहेरी जीवन, नवे संसार, चंदनवाडी या कांदबरी राजकीय पार्श्वभूमी आहे." ल.ब. भोपटकर यांनी 'मृत्यूच्या मांडीवर'(१९३१) ही कादंबरी गोऱ्यांबद्दल चीड आणि देशभक्तावर प्रेम करणारी नायिका असे चित्रण आहे. सानेगुरूजी यांची 'आस्तिक' (१९३३)'सती'(१९४०) इ. प्रेमाकंटक यांची 'काम आणि कामिनी'(१९३७) वरेरकरांचा 'न पुजलेली देवता'(१९४०-४४) आणि 'शिपायाची बायको'(१९४३) श्री. वि.स. खांडेकरांची 'पांढरे ढग'(१९३९) इ. कादंबरीमध्ये राजकीय पार्श्वभूमी आहे असे म्हणता येणार नाही.

ना.के.महाजन यांच्या आकाराने व आवाक्याने छोट्या कादंबऱ्या राजकीय कादंबरी या दृष्टीने महत्वाच्या ताटतात. श.वा. शास्त्री यांची 'गावगुंड' (१९४५) ना.के. महाजन 'झुंज' (१९४४) या कादंबरीना राजकीय घटनाची पार्श्वभूमी लागलेल्या दिसतात.

१९२० नंतर कादंबरीवर पडलेले सुखवादी मनाचे सावट, प्रणयप्रधान कादंबऱ्याची एकूण सामुदायीक जीवनाकडे वस्तुनिष्ठपणे न पाहता व्यक्तिनिष्ठ दृष्टीने पाहण्याची वृत्ती यामुळे मराठीला कादंबरीतल्या एखाद्या पात्राचा राजकारणाशी सबंध आहे असे दाखवल्याने कादंबरी राजकीय होत नाही. उदा. इंदू काळे सरला भोळे तील पात्र गांधीवादी तत्वज्ञान मानून त्याचप्रमाणे खेड्यात जाऊन जीवन व्यतीत करतात. 'क्रौचवध' (वि.स.खांडेकर) नायक संस्थानिका विरूध्द बंड करणारा क्रांतीकारी आहे. परंतु कांदबरी राजकीय अशा म्हणजे 'रानभुल' (ए.वि.जोशी) 'आग' (पु.भा. भावे) 'झाकोळ' (मनोहर शहाणे) 'सिंहासन' (अरूण साधू) 'डोंबाऱ्याचा खेळ' (भाऊ पाध्ये) इ. होत.

**मनोवैज्ञानिक कादंबरी –**

मनोविश्लेषणात्मक किंवा मनोवैज्ञानिक कादंबरीची सुरूवात १९२५ नंतर झाली. जीवनाच्या अनुभवाविषयी, अनुभव घेणाऱ्या विषयी, मनाच्या मागे अहं विषयी नवीन विचार आले. व्यक्तिच्या अंतर्यायामातील, भावजीवनाचा विश्लेषणपूर्वक अविष्कार करणारा महत्त्वाचे लेखक म्हणून पु.य.देशपांडे यांचा उल्लेख केला जातो. त्यांची 'सुकलेले फुल', 'काळी राणी' या कादंबरीतून पात्राच्या मनातील भावना, विचार यांचे चित्रण येते. मनोव्यापाराचे पुर्वापार सबंध दाखवताना घटना घडताना दाखविल्या तर त्या घटनाचक्राला मानवी मनाचा स्पर्श होत नसेल तर ते साहित्य होवू शकत नाही. मानवी मनाला महत्व देऊन कादंबरीचा घटना क्रम दाखवला जातो. अशा कादंबरींना मनोविश्लेषनात्मक कादंबरी म्हणणे योग्य होणार नाही. "विभावरी शिरूरकर यांची 'हिंदोळ्यावर' किंवा ना.सी.फडके यांची 'उध्दार' कादंबरींना मनोविश्लेषणात्मक मानले जाते. ही केवळ पात्रांच्या मनातील हिंदोळ्यावर कादंबरीत नायिकेच्या मनातील विचार लेखिकेने व्यक्त केले आहेत. तसे पाहिले तर हरिभाऊ आपटेंनी वज्राघात कादंबरीत पात्रांच्या मनातल्या खळबळीचे चित्र रंगविले आहे. या सर्वांना मनोविश्लेषणात्मक

कादंबरी म्हणणे फारसे बरोबर नाही. मनोविश्लेषणात्मक किंवा मनोवैज्ञानिक कादंबरी ही केवळ.......... विचार मांडणारी कादंबरी नसते." [२४] माणसांच्या मनाविषयी काही नव्या गोष्टी मनोविश्लेषनशास्त्राने सांगितले. माणसाचे मन एकेरी व दुहेरी नसते ते अतिशय गुंतागुंतीचे जाळे असते. माणुस काही क्षणे सात्विक असतो तर त्याच्यामध्ये तामस वृत्तीही दिसून येते. प्रकट मनाच्या नेणिवेचे प्रचंड अस्तित्व कार्यरत असते. माणसाचा व्यवहार सामाजिक बंधनांनी नितीनियमांनी साचेबंधपणे चालविलेला असतो. मानवी मनातील सूक्ष्मातिसूक्ष्म घडामोडींचे चित्रण करण्यावर ही कादंबरी भर देते. बाह्य घटनांमुळे मनावर होणारे परिणाम किंवा बदल विचारांची साखळी मनामध्ये दडपूण ठेवलेल्या वृत्ती वेगवेगळ्या प्रकारे उफाळून येणे हे चित्रण कादंबरी करत असते. मनोविश्लेषक कादंबरीकार मनाच्या अंर्तभागाचे नेणिवेचे अवास्तव व अवाढव्य स्वरूप दाखवताना माणसाच्या रेखीव बौध्दिक विचारांना निर्णयांना स्थिरपणे व्यक्त होत जाणाऱ्या भावाविष्काराला बाजूला ठेवतो. वरवर असंगत व विसंगत दिसणाऱ्या तो अनेक प्रयोग करतो.

"माडखोलकर व पु.य.देशपांडे यांच्या कादंबरीतून मनोविश्लेषणात्मक स्वरूपाच्या बाबी आलेल्या दिसतात. माडखोलकरांवर नैतिक दृष्टीतून अश्लिलता व अनैतिक आचरण रंगविल्यामुळे मानसशास्त्रीय भूमिकेतून त्यांच्या कादंबरींचे अवलोकन करताना असबंध्द वाटतात. 'भंगलेले देऊळ' 'दुहेरी जीवन' 'शाप' या कादंबरीच्या दृष्टीने विचार करताना वेगळ्या गोष्टींचे श्रेय द्यावे लागते." [२५] मनोवैज्ञानिक कादंबरीमध्ये 'कथा' या घटकाला महत्व नसल्याने पात्राच्या मनाचे सुक्ष्म निरीक्षण हा कादंबरीचा उद्देश असतो. वरवर दिसणाऱ्या वर्तनापेक्षा मानवी मनाचा 'आतला हुंकार' महत्वाचा असतो. मन एकाच वेळी भुत, वर्तमान, भविष्य अशा तिन्ही ठिकाणी संचार करते व एकाच क्षणी बालपणातल्या हजारो घटना अनुभवातून फिरून वर्तमानात येवू शकते. घटका अनुभव भुतकालीन क्षण क्रमाने येत नाहीत. त्यांचा क्रम विस्कटलेला असतो. त्याचे रूप बदलते व प्रत्येकाच्या मनात भुतकालीन क्षण तरंगू लागतात. मनात चाललेल्या या व्यापाराचे तपशिलवार व बारकाईने केलेले चित्रण मनोवैज्ञानिक कादंबरीत येते. मानसशास्त्रीय प्रेरणा जागृत झाल्यामुळे पु.य. देशपांडे यांच्या 'सुकलेले फुल' मधील नायिका आजारी पडते.

नियोजित वरापासून दुर पळणे तिच्या मनाचा डाव होतो. मराठी कादंबरीवर मनाविज्ञानाचा आशयाच्या दृष्टीने प्रभाव कमी पडला परंतु अभिव्यक्तिच्या दृष्टीने पडलेला प्रभाव अधिक क्षीण होता. कादंबरीकारांनी सुधारणावाद, गांधीवाद, समाजवाद याकडे सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठी आस्थेने पाहीले. आदर्शीकरण सौंदर्यवादी दृष्टी हे वादाचा पगडा असल्यामुळे मानवी मनाचे निखळपणे शोध घेण्याचे कार्य कमी झाले. मानवी मनाकडे पाहण्याचे लेखकीय मन अनेक बंधनाने बांधल्याने हव्या असलेल्या आवशक्य मनाकडे पाहू शकले नाहीत काहींनी मनाकडे वस्तुनिष्टपने पाहण्याचा प्रयत्न केला त्यामूळे जीवनानूभवाकडे मोकळे पणे पाहण्याचा मार्ग मोकळा झाला असे वाटत नाही. "'रणांगण ' या कादंबरी मध्ये प्रणय स्त्री-पुरुष संबंध याकडे केवळ निखळ जीवनानुभव म्हणून कादंबरीकार पाहतो. या कादंबरीची रचना त्याच्या मनोविश्वावर झालेली असल्याने कादंबरीमध्ये घडनाऱ्या घटनावर विश्वयुद्ध, ज्यूंच्या भयावह घटना,उध्वस्थ संसार हे सर्व वास्तव घटनांतून संवादातून वाचकापुढे ठेवतो.या दृष्टीने ही एक मनोविश्लेषनात्मक कादंबरी आहे."[२६]

**संज्ञाप्रवाहात्मक कादंबरी-**

'Stream of conscousness'ह्या इंग्रजी शब्दसमूहाचे हे भाषांतर होय.हा शब्द प्रयोग विल्यम जेम्स ने केला. संज्ञाप्रवाहात्मक कादंबरीत भाषिक पातळीमध्ये पूर्वी झालेल्या विचारांची अपरिपक्वतेची जाणीव होते.१९३९मध्ये बेडेकरांची 'रणांगण 'प्रसिध्द झाल्यावर १९४० मध्ये मर्ढेकरांची 'रात्रीचा दिवस'यामूळे मराठी कादंबरीच नव्हेतर कथा, काव्य यामध्येही बदल घडुन आले.'भाषापूर्व पातळीवरच्या स्मृती, भावना आणि विचार एखाद्या प्रवाहा प्रमाणे आवेगाने परस्परांमध्ये मिसळून आलेल्या आशा जेथे व्यक्त केलेल्या असतात त्या कादंबरीला संज्ञाप्रवाहात्मक कादंबरी म्हणता येईल.' मर्ढेकराची 'पाणी',वसंत कानेटकरांची 'घर','झपूर्झा',या मध्ये संज्ञाप्रवाहाचा वापर केला.'मनाचा शोध' घेणे चालूच होते. परंतू ते तत्त्व निवेदनशैलीपुरते मर्यादित वाटते. अत्यंत वैयक्तिक अशा अनुच्चारित संज्ञेचे अतार्किक आणि असंगत स्वरूप पकडून वाचकांपर्यंत पोहचवणे अवघड वाटते. घटना स्वभावरेखाटन शैली यावरच कादंबरीकारांनी भर दिला आहे तेथे अपुरे पडले. जुने लेखक जी सुसंगती साधून

कलाकृती निर्माण कशी करावी हे त्यांना समजले नाही. जुन्या लेखकांच्या मनाला अंतरावर तारा असणाऱ्या तंबोऱ्यासारखे समजत तसे न मानता एकमेकात गुरफटलेल्या तारांसारखे असते. हे लक्षात घेऊन मन गतिमान असून गतिमानता व संकिर्णत्त्व यांच्यामुळे त्यास 'प्रवाह' संबोधिले गेले संज्ञा प्रवाहाचे लेखन वैशिष्ट्य संपूर्ण मनाचे दर्शन होय. भालचंद्र नेमाडेंची 'कोसला', 'किरण' नगरकरांची 'सात सक्कं त्रेचाळीस' कमल देसाईंची 'काळा सूर्य' चि. त्र्य. खानोलकरांची 'अजगर' या कादंबऱ्यातून संज्ञा प्रवाहाचा वापर केला आहे. विशिष्ट काळाचा लहान तुकडा अमर्याद ताणून मोठा काळ क्षणार्धात चमकला जातो या संज्ञेचे विलक्षण स्वरूप शब्दात बद्ध करण्याचा प्रयत्न लेखक करतो आंतरिक विश्वात सुक्ष्म मनोव्यापार अत्यंत गुढ पातळीवर संवेदनाचे विश्व साकार करतो मनातील विचार पात्राच्या तोंडून स्वगत च्या माध्यमातून शब्दबद्ध करत असतो.

मराठीमध्ये 'रात्रीचा दिवस 'ही कादंबरी संज्ञाप्रवाहात्मक असून तो एक प्रयोग आहे. मर्ढेकरांनी स्वत: लिखाण हाच शब्द अनेकदा वापरला आहे.

**प्रादेशिक कादंबरी**

१९३५ च्या सुमारास मराठी कांदबरी गतिशून्य होत होती व एकाच प्रकारच्या आवर्तनात सापडली होती. लेखकाचे जुने कलाविश्व नाविन्याचा अभाव आदर्श व वास्तव ह्या तात्विक द्वंद्वात कादंबरी सापडल्याने अनुभवविश्व व सांकेतिकता हे जीवन रसभरित करण्याचा उद्देशाने १९४० ला प्रादेशिक कादंबरीचा जन्म झाला. सामान्यत: ग्रामीण वास्तवाचे चित्रण करणे आणि त्या प्रदेशातील निसर्ग, विशिष्ट संस्कृती, आचार, जीवनसरणी आणि भाषा यांचा तिथे वापर असतो. तिला प्रादेशिक कादंबरी म्हणतात. निसर्ग संस्कृती, आचार, विचार यांना केंद्रस्थान करून लेखकाने लेखणीवर भर दिला आहे. प्रादेशिक कांदबरीवर प्रथमत: जाणवतो तो प्रदेश 'पूर्णामाईची लेकरे', विदर्भाकडची 'बनगरवाडी', देशावरची 'पडघवली', उत्तर कोकणातील 'गारंबीचा बापू', गोमांतकाची 'भावीण,' दक्षिण कोकणातली 'बळी,' मराठवाड्याची 'रानभूल,' हा सर्व परिसर पूर्वी कादंबरीत आला असून आता त्याचे स्वरूप बदलले दिसते. स्वयंभू होवून प्रादेशिकतेमध्ये जोराने डोकावणारी कल्पना भौगोलिक वाटतात. 'पाणकळा'ही दिघेंची कादंबरी

१९४० मध्ये प्रसिद्ध झाली. वरेरकरांची 'फाटकी वाकळ' 'सात लाखातील एक'ह्या प्रादेशिक कादंबरीतून पहिल्या कलाकृती होत. चिंदरकर यांची 'महापूर' १९४२, ग.ल.ठोकळांची 'गावगुंड' १९४७, श्री.ना.पेंडसे 'गारंबीचा बापू, हत्या, यशोदा' गो.नी.दांडेकरांची 'शितू ''माचीवरचा बुधा' इ. कादंबरी प्रादेशिकच्या बाबतीत वेगळ्या अर्थाने मोडतात.

'बनगरवाडी'या कादंबरीत औंध संस्थानातील ओसाड माळरानावरच्या धनगरांच्या वस्तीचे आणि संथ, रूटुखुटू चाललेल्या निसर्गाच्या लहरीवर विसंबलेल्या जीवनाचे चित्रण येते. प्रादेशिक कादंबरी सामुहिकतेने भरलेली असते. बोरकरांची 'भावीण'प्रादेशिक असून सामुहिकता नसलेली आढळते. प्रादेशिक कादंबरीची वैशिष्ट्ये पाहताना त्यात यंत्रदुर जीवन, भौगोलिकता, मागासलेपणा, जमातचित्रण, सामूहिकता, नवे रांगडे जीवन, वेगळी भाषा इ. 'पडघवली'ला महत्त्वाचे स्थान असून रत्नागिरी जिल्हाचे सविस्तर चित्रण कादंबरीत येते. नष्ट होत जाणारे खेडे, सेवा, श्रद्धा, शौर्य, स्वामिभक्ती यातून 'पडघवली'ची निर्मिती दर्शवतात प्रादेशिकता आणि ग्रामीणता यात फरक असतो कादंबरीत त्या त्या प्रदेशाची खास भौगोलिक वैशिष्ट्य मागासलेपणा व लोकसंस्कृतीचे चित्रण असते. प्रदेशातल्या ग्राम विभागाचेही दर्शन होते. निसर्ग, परिसर व लोक यावर ती भर देते. "ग्रामीण कादंबरी एकाद्या गावातील जीवनाची रहाटी जीवनाची लय त्या विशिष्ट वर्णित गावाच्या समस्या यांच्या संदर्भात व्यक्तिनिष्ठ जीवन रंगविते. उदा:- 'धग'(उद्धव शेळके) ही प्रादेशिक कादंबरी असून विदर्भातील लोकसंस्कृती व जीवन धग मधून चित्रित कोकणातील निसर्ग लोकसंस्कृती 'गारंबीचा बापू'परंतू 'गोतावळा'ही मात्र प्रादेशिक भाग चित्रण करीत नाही."[२७]

**सामाजिक कादंबरी :-**

सामाजिक कादंबरी भोवतालच्या सृष्टीचे व सद्यकालीन आणि भावी समाजाचे चित्र रंगवितात सभोवतालच्या समाजाचे सूक्ष्म अवलोकन करून त्यातील वर्तमान व भावी अंत:प्रवाहाची दिशा व्यक्त करून समाजाचे चित्र रंगविणे हे सामाजिक कादंबरीकाराचे साध्य असते. इंग्रजी शिक्षणाच्या प्रसारामुळे येथील लोकांना आपला धर्म व रूढी याची पाहणी केल्यावर बालविवाह, स्त्री-शिक्षण, विधवा विवाह याच्यावर चर्चा होत असताना 'यमुनापर्यटन'(१८५७)

ला बाबा पद्मनजी यांनी लिहिली.

सामाजिक कादंबरीतील पात्रे सर्वस्वी काल्पनिक असली तरी विशिष्टगटाचे प्रतिनिधित्व करत असतात. प्राथमिक स्वरूपामध्ये पात्रांच्या जीवनातील घटना देवून गुंतागुंतीच्या प्रश्नांवर प्रकाश टाकणाऱ्या कादंबरी लेखाचा दृष्टीकोन व्यक्त करतात.

सामाजिक कादंबरीमध्ये वेगवेगळे विषय कादंबरीकार कथानकांसाठी योजलेली पार्श्वभुमी व कादंबरीच्या कार्यक्षेत्राविषयी लेखकाच्या अपेक्षा व कल्पना या सर्वांचा विचार करून कादंबरीतील अनेक विभाग येतात. कादंबरीकाराची कादंबरी लेखन प्रसंगीची वृत्ती लक्षात घेऊ न सामाजिक कादंबरीचे तीन प्रकार पडलेले दिसतात. विनायक बाळकृष्ण दामले यांची 'अवलिया'(१८५९) 'शिरस्तेदार'(१८८१) ही बालबोधकर्ते यांची त्यांनी एक सामान्य कारकून शिरस्तेदारी पर्यंत प्रवास कथन केला आहे. याशिवाय 'आनंदराव' 'सद्गुणी सून' अश्या रूपांतरित कादंबरी आढळतात म.वि. रघळकरांची 'नारायणराव आणि गोदावरी' (१८८४) यामध्ये पैशाच्या लोभाने वृद्ध मानसास पोटची पोरगी देणारे आईबाप दिसतात. हरिभाऊनी मनुष्यत्वाकडून देवत्वाकडे न्यावे, सद्भिरूचीने संपन्न व्हावे या हेतूने लेखन 'मधली स्थिती' (१८८५-८६) 'गणपतराव' 'पण लक्षात कोण घेतो' 'यशवंतराव खरे' 'मी' 'जग हे असे आहे' 'भयंकर दिव्य' 'आजच' 'मायेचा बाजार' 'कर्मयोगी' इ. घेत. "सामाजिक कादंबरीमध्ये कल्पनारम्य, वास्तववादी व प्रचारकी कादंबरी असे तीन प्रकार आहेत."[२८]

## १) कल्पनारम्य कादंबरी :-

कल्पनारम्य कादंबरी सत्यसृष्टीच्या आधारावर रचलेल्या असल्याने त्यातील पात्रे अतिमानव नसून समाजात ज्याच्या भेटीगाठी होतात अशीच माणसे असतात. त्यातील चित्र जीवनातील असून अशक्य कोटीतले नसते व प्रातिनिधीक नसते म्हणून कल्पनारम्य ही संज्ञा देतात. कथानकात मनोवेधकता आणण्यासाठी अनेक साधनांचा उपयोग केला जावून अद्भूत वातावरण बालमनाला मोहिनी घालते सत्यसृष्टीत असणाऱ्या अतिविश्वसनीय वाटणाऱ्या गोष्टीना कथानकात आनून वाव दिल्याने, विश्वसनीय वातावरण निर्माण होते. नेहमीच त्याच त्या गोष्टीकडे

दुर्लक्ष करून काल्पनिक जरी असले तरी मनाला विरंगुळा मिळतो.

मानसशास्त्रीय दृष्ट्या स्वप्नसृष्टीचे व्यक्तीमत्वाला जे महत्व व साधारण परिस्थितीने पिचलेल्या मानवाला अश्या वाड:मयसृष्टीचे आहे. सुटकेची भावना हीच अशा प्रकारच्या कादंबरीचा आत्मा आहे. ही प्रवृत्ती सर्व ठिकाणी दिसून येते. वाड्:मयइतिहासामध्ये सिंहावलोकन केल्यास कल्पनारम्य व यथार्थ चित्रण प्रवृत्ती थोडे फार फरकाने आलटून पालटून अधिराज्य गाजवताना दिसतात.

‘ कल्पनारम्य कादंबऱ्यांचे अत्युत्कृष्ठ उदा:- प्रा. फडके यांच्या कादंबऱ्या हे होय.’ “कल्पनारम्य कादंबरीत नायक-नायिका अमानुष नसतात मानवी चरित्र घटनाच्या द्वारे प्रतिबिंबीत त्यांच्या जीवनाचे आपणास मिळणारे चित्र सर्वत्र जरी नव्हे तरी क्वचीत प्रसंगी पहावयास मिळू शकते. जीवनाचा रमणीय भाग व्यापने प्रणयाची भावना ही कल्पनारम्य वातावरणाचा एक महत्वाचा घटक असून त्याच्या केद्राभोवती रम्यसृष्टी निर्मिने गरजेच असते.”[२१]

मराठी कादंबरीची सुरूवात अद्‌भुत व कल्पनारम्य कादंबरीपासून झाली व त्याचा अतिरेक झाल्यावर वास्तववादी संप्रदाय उदयास आला. महाविद्यालयीन तरूण-तरूणीच्या प्रणयी भावनेवर कादंबरी लिहील्या प्रा.फडकेंनी विलासी वातावरण व गोड शेवट यावर भर दिला.

१९२५ ते १९३५ या कालखंडामध्ये कल्पनारम्य कादंबरीला बहर येऊन खांडेकरांनी ‘हृदयाची हाक’,‘ काचंनमृग’ या कादंबरीमधून फडकेच्या कलावादाशी तडजोड करावी लागली. १९३५ नंतर यामध्ये बदल झाला. त्याचेच अपत्य म्हणून पु.ल.देशपांडेची ‘विशाल जीवन’हि कादंबरी पाहताना कलाकृती नायक श्रेष्ट असूनही मनाला शांती मिळत नाही म्हणून एकूण समाजरचनेचा विचार करतो.

खांडेकरांनी जीवनाकरता कला या मुल्यांचा स्विकार केल्याने खांडेकर यांच्या प्रयत्नाने मराठी कादंबरी समाजभिमुख होवून कल्पनारम्य कादंबरीचा बहर ओसरला.

**वास्तववादी कादंबरी :-**

याप्रकारची कादंबरी ही कल्पनारम्य कादंबरीचे विरूद्‌ध टोक होय. वास्तववादी संप्रदाय सर्वस्पर्शी असून परस्परांहून भिन्न अशा कादंबऱ्याचा यामध्ये समावेश होतो. “काल्पनिक

कादंबऱ्यांची प्रतिक्रिया म्हणूनच वास्तववादी कादंबरी जन्मास येते. सामान्य घरगुती जीवनची चित्रे देणाऱ्या कादंबऱ्या याच वर्गात मोडतात. त्याच बरोबर वास्तववादी कादंबऱ्यांचे ध्येय वस्तुस्थितीचे यथार्थ चित्रण करणे हेच असले तरी नुसतेच तेवढेच करून त्या थांबत नाहीत. सभोवतालच्या सृष्टीकडेच मनुष्य वळला म्हणजे तो सहजिकच चिकित्सक बनू आत्मपरिक्षणाची प्रवृत्ती त्यांच्यात उत्पन्न होते."[३०]

"वास्तववादी संप्रदायात युरोपमध्ये औद्योगिक क्रांती व शास्त्रीय संशोधनाच्या काळात सुरूवात झाल्याने वस्तूचित्रणाबरोबर समाजातील तळातील लोकांच्या जीवनाची चित्रे रेखाटणे श्लील अश्लील ही बंधने झुगारून समाजजीवनाच्या सर्व अंगाचे यथार्थ चित्र देणे ही प्रमुख अंगे होत."[३१] जोरवेकरांची 'विचित्रपुरी' ही (१८७०) साली प्रसिद्ध झालेली कादंबरी एका हेतूने लिहिलेली असून पुष्कळ अद्‌भुत गोष्टींचा त्यात उपहास केलेला आहे. "नारायणराव व गोदावरी' यामधून संसारचित्र चांगले उमटले असून वि.को.ओकांची 'शिरस्तेदार' (१८८१)'शिक्षक' (१८८३) वगैरे वास्तववादी कादंबरी लिहिल्या जाऊन वास्तवादी कादंबऱ्यांची पाऊलवाट चांगलीच मळली गेली."[३२]

कादंबरी वाङ्:मयामध्ये सामाजिक प्रश्नांची चर्चा वा.म.जोशीनी करण्यास चालना दिली 'रागिणी' ला त्यांनी 'काव्यशास्त्र विनोद' हे वैकल्पिक नाव दिले. 'सुशीलेच्या देव' मध्ये तात्वीक चर्चा दिसते त्याच्या टिकात्मक कादंबरी नसल्या तरी त्या प्रश्नार्थक आहेत.

पु.य.देशपांडे यांची 'बंधनाच्या पलीकडे'(१९२७) ला प्रसिद्ध झाली. श्री.रांगणेकरांची 'सिमोल्लंघन' गीता साने यांची'निखळलेली हिरकणी' यामध्ये जीवनातील असमाधान व्यक्त होते. 'सुकलेले फुल' 'विरलेले स्वप्न' या कादंबरीनी वास्तववादी कादंबरीच्या क्षेत्रात क्रांती घडवून आणली युद्धोत्तर काळात मराठी कादंबरीमध्ये समाजजीवनाचे चित्रण स्पष्टपणे दिसू लागले.

'नवेसंसार'ग.त्र्य. माडखोलकरांची (१९४१)' वैष्णव' वि.वा. शिरवाडकर (१९४६) श्री. ना. पेंडसे 'हद्दपार' या मधून दिसू लागले.

**प्रचारकी कादंबरी –**

प्रश्नार्थक कादंबरीची परिणती अनेकदा न कळत प्रचारकी स्वरूपात प्रकट होते. प्रचारकी कादंबरी हे बोधवादाचे टोक आहे. मराठी कथावाङ्मयाचा प्रारंभ बोधकथापासून झाला. प्रचारकीकादंबरी वाङ्मयाला मराठीमध्ये श्री. नारायण हरी आपटे यांनी केली. मनामध्ये हेतू सुखात ठेवून तरूण पिढीस उपदेशाचे चार धडे द्यावेत म्हणून त्यांनी कादंबरी लिहिल्या यामुळे त्यांनी कथानायक आकर्षक करण्याऐवजी त्यामध्ये नितीतत्वे बिंबवण्यासाठी प्रयत्न दिसतात. सद्‌गुणांचा प्रचार करण्याच्या इच्छेने कादंबरीचे कथानक'इंद्रभूवन' 'गुहा' 'मंजुघोषा'इ. अद्‌भुत कादंबरी काळाला शोभतील असेच दिसतात.

प्रचारकी कादंबरीमुळे कलेला हिनकसपणा येण्याचा संभव असतो. तत्वाविषयीच्या प्रेमाणे त्यांना पुर्णपणे भारलेले असते. श्री.वि.वा.जोशी 'जन्माचा बंदिवास' (१९३१) 'पराधीन '(१९३०) या कादंबरीमधून हिंदू स्त्रियांची कैफियत मांडण्यासाठी लिहिल्या आहेत. दुसऱ्या महायुद्‌धोत्तर अनेक लेखिकांनी कादंबरी लेखन केले. लोकप्रिय माध्यमाच्या व्दारे स्त्रियांची कैफियत मांडण्यासाठी स्त्रियांच्या हक्कासंबधीच्या सौ. कमलाबाई बम्बेवाले, सौ. शांताबाई नाशिककर या स्त्री कादंबरीकारांच्या कृती प्रचारकी थाटाच्या वाटतात. या लेखिकांनी 'लग्नाचा बाजार' (१९२९) 'हाच का धर्म '(१९३०) 'बंधमुक्ता' (१९३०) ही नावे कादंबरी प्रचारकी स्वरूपाचे कल्पना देणारे आहेत. "पुष्कळदा तर आशा कादंबरीतून कथानकाशी आपणास कथानकाशी वस्तुत: संबंध नसलेले अतएव अनावश्यक असे निबंध, भाषणे मुद्‌दामच कथानकात आणलेली दिसतात. 'लग्नाचा बाजार' मधील सरस्वतीचा आश्रम, कर्तव्याची जाणीव, सरस्वती मंदीराची योजना, मसुदा किंवा निर्माल्याची कळी मधील वत्सलतेचे भाषण ही वर सांगितलेल्या प्रकाराची उदाहरणे दिसतात." [33] प्रचारकी कादंबरीचा मुख्य दोष म्हणजे कादंबरीच्या सर्व घटकांचा परिपोष मतप्रचाराच्या दृष्टीने होतो. त्याचा परिणाम पात्राच्या कल्पनेवर होतो. कलेची पातळी खालावते त्यामुळे जीवनाचे चित्रण एकांगी होते. "मराठी वाङ्:मयामध्ये प्रचारकी कादंबरीचे कट्टे पुरस्कर्ते श्री. वरेरकर आहेत ते म्हणतात ज्याला कलात्मक लिखाण असे म्हणतात त्या लिखाणाने उत्पन्न होणारा आनंद तत्कालीन असतो. प्रचारात्मक

कलावाचकावर कायमचा ठसा उमटवू शकतो."[३४]

**दलित वर्गाच्या जीवनावरील कादंबरी –**

व्दितीय महायुद्धानंतर महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील समाजरचनेमध्ये मोठी क्रांती झालेली दिसते. समाजरचनेमध्ये पांढरपेशा सुशिक्षितांनी एक मानाचे स्थान होते. साहित्यकार व कलावंत बहुसंख्यांक असलेल्या रचनेतील लोक पांढरपेशा वर्गातीलच असत त्यामुळे त्यांना जवळून स्पर्श करणाऱ्या प्रश्नांचीच चिकित्सा करत. महायुद्धानंतरच्या महागाईने भिषण स्वरूप धारण केले. त्यामुळे समाज रचनेतील पांढरपेशा वर्गाचे स्थान डळमळीत झाले. लेखकच समाजातील अन्य स्तरावर असलेल्या लोकांच्या जीवनाकडे अधिक जिव्हाळ्याने पाहू लागले. वास्तववादी मराठी सामाजीककादंबरीने व्दितीय महायुद्धानंतर नवीन रूप धारण केले. मराठी कादंबरीकारांनी मध्यमवर्गीय समाज जीवनाच्या चित्रणाचा रस्ता सोडून इतर वाटा धुडांवयास सुरूवात केली. काही कादंबरी कधी बोधवादी तर कधी समाज जीवनाचे यथार्थ चित्रण करणाऱ्या भिन्न स्वरूपाचे दिसते.उदा. र.वा.दिघे यांची ग्रामीण जीवनावरील 'सराई' श्री.राम तनयांची 'खरा उध्दार' ही बोध वादी तर रणजित देसाई यांची 'माझा गाव' किंवा शंकर पाटील' टारफुला' या कादंबरी वास्तववादी आहेत. मागासलेल्याजाती रामोशी आदी लोकांच्या जीवनाचे चित्रण करण्यास मराठी कादंबरीकारांनी सुरूवात केली व त्यांना खऱ्या अर्थाने समाजजीवनाचे चित्रण होवू लागले. समाज जीवनाचे मार्मीक निरिक्षण करूण प्रसंगी त्यांच्या जीवनाशी समरस होवून नवीन अनुभव घेवून कथा कादंबरी व्दारे ते व्यक्त करावे. महाराष्ट्रातील समाजजीवनाच्या विविध स्वरूपातील दर्शन मराठी कथा कादंबरीतून प्रत्ययास येत असल्याचे दिसते. रणजित देसाई यांची 'बारी'(१९५९) ही कादंबरी रामोशी लोकांच्या जीवनावर आहे. जयंत दळवी यांची 'चक्र'(१९६७) या कादंबरीत मुंबईतील झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांचे चित्रण येते. मराठी कादंबरीकार व्यक्ती जीवनावर लेखण केल्यामुळे कादंबरी समाजभिमूख राहिलेली दिसत नाही. 'रात्र काळी घागर काळी' 'अजगर' 'कोसला' या चालू दशकातील कादंबरी समाज जीवनाला स्पर्श करताना दिसतात.

## आधुनिक मराठी कादंबरीचा विकास –

मराठी वाङ्:मयाच्या इतिहासाचा विचार करता मराठी कादंबरी इतर शाखांच्या मानाने बहरलेली दिसली तरी काव्याच्या तुलनेत ही शाखा नवीन आहे. मराठी कादंबरीच्या स्वरूपात अनेक स्थिंत्यरे झाली असून आजच्या कादंबरीचे स्वरूप' मंजुघोषा', ' मुक्तामाला' आदी सुरूवातीच्या कादंबरीहून भिन्न आहेत. प्राचीन संस्कृत साहित्यात कथा वाङ्:मय पुष्कळ असून त्याचे स्वरूप लौकीकास पात्र आहेत. जगाचे प्रतिबिंब उमटविणारे कादंबरी प्रकाराचे परिणत रूप प्राप्त झाले असले तरी त्यात पुष्कळ बीजे दिसतात. प्राकृत मध्ये कथा साहित्य विपुल असून त्यामध्ये गुणाढ्याची 'बृहत्कथा' 'लोकविश्रुतच' आहेत.

हरिभाऊंची 'मधली स्थिंती' (१८८५) 'पुणे वैभव पत्र' मधुन क्रमश: प्रसिध्द 'रेनॉल्डस 'च्या (Old London) मधून पहिले प्रकरण भाषांतरीत आहेत. त्यांच्या कादंबरीमध्ये स्वभाव रेखनापेक्षा कथानकास महत्व दिलेले दिसते. हरिभाऊ वस्तुस्थिंती निदर्शक कादंबरीस प्रारंभ झाला त्यांच्या कादंबरी म्हणजे कला ध्येयवाद यांचा मधुर संगम होय. असे त्यांचे चरित्रकत्री म्हणतात.काही लेखकांनी कादंबरीला मिळालेली लोकप्रियता पाहून स्वत:चे विचारांचे वाहन म्हणून किंवा हौस म्हणून कादंबरी लिहून पाहिल्या यात काही शि.म. परांजपेंची 'गोविंदाची गोष्ट' सी.के. दामले 'जग हे त्रिविध आहे.' भाषांतरीत व रूपांतरीत कादंबरी प्रसिध्द झाल्या भाषांतरे ही इंग्रजी व बंगाली कांदबरीची झालेली दिसतात त्यामध्ये प्रमुख कै मित्र, वा.गो.आपटे श्री.वि.सी गुजर इ. नाथमाधव व वि.वा. हडप यांनी कादंबरीव्दारे शिवकालीन व पेशवेकालीन इतिहास लिहिला. चि.वि. वैद्य सहकारी कृष्ण यांच्यासारखे लेखक ऐतिहासिक कादंबरीकडे वळले. याकाळामध्ये मराठी कादंबरीला एक परिमाण लाभले कादंबरी मनोरंजक न होता समाजभिमुख होऊ लागली. हरिभाऊंच्या कादंबरी घटनाप्रधान असल्यातरी संभवनीयतेच्या सिध्दांतावर अधिष्टीत असलेल्या दिसतात. विकासाचा जो थोडाफार प्रत्यय मराठी कादंबरीत येतो तो वामन मल्हारांच्या मुळे त्यांची पात्रे जीवनाचे वरवर दिसणाऱ्या दर्शनापासून खोलवर जावून अंत:प्रवाहाचा शोध घेण्यासाठी धडपडतात. त्यांची शैली साधी, सरळ ,ओघवती, आणि प्रांजळ आहे वळण प्रौढ असून, विस्ताराचा फापट पसारा टाळून वेचक बाबी डोळसपणे

निवडण्याची तिला सवय आहे. सुशिक्षित स्त्रीवर्गाचे इच्छा आकांक्षांचे मनोहर चित्र हळुवारपणे रेखाटले आहे. कल्पनारम्यता असूनही 'रागिणी' ने वाचकांच्या मनाची पकड घेतली. त्यांच्या 'आश्रमहरिणी', 'इंदु काळे आणि सरला भोळे 'यामध्ये कलेला पुर्ण स्वातंत्र्य न देता नीतीशी जुळते घ्यावयास लावणारे बंधनाच्या पलीकडे जाणाऱ्या लोकांचे 'आचार्याचा मान'लाभला नाही.

१९२० नंतरच्या प्रस्तुत कालखंडातील मराठीकादंबरीकडे नजर वळवली म्हणजे तिच्या वैचारिक कलात्मक प्रचारात्मक वैभवात भर टाकण्याची वामन मल्हारांच्या कादंबरीची बीजरूपाने प्रकट होवू शकणारे गुण डॉ. केतकर, श्री. वरेरकर, प्रा.फडके, श्री. पु.य. देशपांडे ,वि.स. खांडेकर, गो. नि. दांडेकर, विभावरी शिरूरकर, श्री.ना.पेंडसे यांच्या कादंबरीत विकास पावल्याचे दिसते. केतकरांच्या कादंबरीतून सामाजिक प्रश्नांची चर्चा करण्याची पध्दत प्रकट होऊन तिचे रूपांतर सामाजीक संशोधनात झाले आहे. 'ब्राम्हणकन्या' 'विचक्षणा' या केतकर वाङ्:मयातील सर्वोत्कृष्ट कादंबरी सुखात किंवा दु:खात होवू न शकणारी कादंबरी वाचताना कलेच्या पातळीवरील अपयश जाणवते. 'गौंडवणातील प्रियवंदा' (१९२६) ही पहिली ही पहिली कादंबरी आहे. 'भटक्या' शेवटची कादंबरी अपूर्ण राहीली त्या कादंबरीतून स्त्रियांचे मानवी समाजातील स्थान शोधू पाहतात. मराठी कादंबरीला कल्पनारम्य सृष्टीत नेण्याचे कार्य ना.सी. फडके यांनी केले. स्त्री सौंदर्याचे ,सुक्ष्म अवलोकन व चित्रण सुशिक्षित युवक युवतींचे प्रेमकुंजन, श्रृगांरिक वातावरण, जनमनाची पकड तात्काळ घेताना दिसतात. खेळकरपणा, ताजेपणा, सफाई, लवचीकपणा व आधुनिक अलंकारांनी फडकेंनी आधुनिक कादंबरीला नटवून आकर्षक केले. कथानकाच्या विकासासाठी अनुलोम विलोम यांचा उपयोग करून कथानकाच्या रचनेमध्ये नाविन्यता विविधता आणली. 'फडकेंनी मराठी कादंबरी वाङ्मयाला दिलेली मृदु व ललित मधुर भाषाशैली मौल्यवान देणगी होय'. श्री.वि.वि. बोकील 'मंगळागौरीच्या रात्री'(१९४१) भा.द.खेर 'सुखाचा लपंडाव' (१९४५) श्री.ना.के. महाजन 'जागृती' (१९४५) या व्यतीरिक्त चंद्रकांत काकोडकर, राजाराजवाडे, कमला फडके, शांता शेळके, लीला देशमुख, शैलजा राजे इ. लेखकांच्या कादंबरीतून फडके यांचा प्रभाव मराठी कादंबरीकारावरती दिसून येतो. पु.य. देशपांडे यांची'बंधनाच्या पलीकडे '(१९२७) त्यांची भूमिका तात्विक असली तरी विचार व कल्पनांचे

अनुकरण मराठी कादंबरीमध्ये निराळे अर्थाने झाले कारण नवीन लेखकांनी जीवनाचा सुक्ष्मपणे अभ्यास केलेला नव्हता त्यांची व्यक्तीत्ववादबद्दलची असाधारण ओढ त्यांच्या कादंबरीतून प्रत्ययास येते. प्रा.फडक्यांचे शिष्यत्व काही अंशाने श्री.ग.त्र्य.माडखोलकर या प्रतिभावान लेखकाने स्विकारले. 'मुक्तात्मा'(१९३३) 'शाप' (१९३६) या मध्ये उन्मादक श्रृगांराची वर्णने आढळतात. १९३५ च्या सुमारास वेश्यांच्या जीवनाबद्दल विलक्षण आकर्षण वाटू लागले. त्यांची आर्थिक परिस्थिती, परिसर ,संस्कार, त्यांच्या भावनांचा होणारा कोंडमारा, अगतिकता यांचे चित्रण कलात्मक रितीने केले आहे. याच प्रश्नांची चर्चा करणाऱ्या कादंबरी अपवादस्वरूप राहीलेल्या दिसतात. मराठी कादंबरी कल्पनारम्य कादंबरी भरभराटीस येत असतानाच ध्येयवादाचा पुरस्कार सानेगुरूजी करायला सिध्द होत होते. 'मानवी जीवनाचा सर्वांगीण विकास करावयास झटतात तेच खरोखर अस्तिंक असे अस्तिकच्या प्रस्तावनेत लिहिले आहे'. कलात्मकतेच्या दृष्टीने सानेगुरूजींचा बोधवाद मराठी कादंबरीस संतुलनाच्या दृष्टीने हितकारक ठरलेला दिसतो. नारायण हरि आपटे यांच्या कादंबरी काळानुसार मध्यमवर्ग संसारिक व वैवाहिक जीवनातील अडचणींचा विचार दिसतो. 'न पटणारी गोष्ट' (१९२२) 'आम्ही दोघे'(१९३४) 'पाच ते पाच '(१९४६) भिन्न भिन्न काळात लिहिलेल्या संसार कथा सामाजिक जीवनातील प्रश्नांचा वेध घेतात. य.गो.जोशी संसारिक कथा लिहिणाऱ्यामध्ये प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल तसेच त्यांच्या 'शेवग्याच्या शेंगा' 'वहिनीच्या बांगड्या'पटकथा सांसारिक साज चढवलेल्या कादंबरी दिसतात. वैवाहिक जीवनावर वेगळ्या पध्दतीने लिहिणारे कवठेकर, खांडे कर, मालतीबाई दांडेकर यांचा उल्लेख करावा लागेल. खांडेकरांनी आपल्या लेखणीतून कथासृष्टी, कल्पनारम्य, भावव्याकुळता, व्याजकाव्यात्म पात्रे विशिष्ट प्रतिकांची बाहुले बनवलेली दिसतात. वैवाहिक जीवनातील अनेक समस्यांचा उहापोह केला कला जीवनाभिमुख असावयास पाहिजे. तात्विक कोंदण दिल्याने तिचे मुल्य कसे वाढते हे 'उल्का'(१९३३) 'दोन ध्रुव'(१३४) इ. कादंबरीतून प्रत्ययास येते. नवदांपत्यांना येणाऱ्या विविध अनुभवांची 'विचक्षणा','सुखाचा शोध', 'जळलेला मोहर' इ. कादंबरीतुन चित्रण येते. महिलांच्या दृष्टीकोनातून लेखिकांमध्ये मालतीबाई दांडेकर, शांताबाई नाशिककर, गीता साने यांनी कुटूंबात एकरूप होण्यासाठी कोणती

वृत्ती असावी हे दाखविण्यासाठी 'भावी गृहिणी''अमरप्रिती' 'संसारात पदार्पण'' काटेरी मार्ग'संसारकथा व्दारे मध्यमवर्गीय समाज जीवनाचे चित्रण मराठी कादंबरीत होऊ लागले. सामाजिक सुधारणेसंबंधी उत्साहपुर्ण अनुकूलता प्रकट करण्यासाठी कादंबरीकारांची संख्या अधिक असलेली दिसते. मा.दा.आळतेकरांनी सुशिक्षित तरूण-तरूणींच्या प्रगतीवादी आशाआकांक्षांचे चित्रण करताना सावेश समजपुर्वक सहानुभूती दाखविली. 'कठीण कसोटी'(१९२९) 'जन्माचा बंदिवास'(१९३१) 'पराधीन'(१९३५) 'ओघळलेले मोती' (१९३७) 'न सुटलेले कोडे '(१९३९) 'अंतर'(१९४१) या कांदबरीतून मिश्र विवाह घटस्फोटाची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. काशीबाई कानीटकरांची 'पालखीचा गोंडा'या कांदबरीतून रूपगुणसंपन्न व कर्तबगार स्त्रीची कहानी सांगितली आहे.व्दितीय महायुध्दास प्रारंभ १९३९ ला झाला असला तरी त्याची झळ १९४२ नंतर बसली देशातील आर्थिक जीवनात परिवर्तन झाल्याने त्याचा परिणाम मध्यमवर्गीयांच्या जीवनात दिसू लागला. समाज जीवनातील क्रांतीचे पडसाद समाजजीवनाचे चित्रण करणाऱ्या वाङ्:मयात उमटू लागले. महायुध्दोत्तर काळात बदल झाल्याने 'परिस्थितीच्या कोलाहलात अनेकांची मते खडबडून जागी झाली आहेत. आपल्या मनातील खळखळ व्यक्त करावी असे अनेकांना वाटत आहे'असे उद्‌गार कै.ग.भा.निरंतर यांनी १९४१ च्या सांवत्सरिक समालोचनात कादंबरी विभाविषयी काढले ते अत्यंत सुचक आहे.

ग्रामीण जीवनाचे चित्रण जीवन कुतूहलाने पाहण्यासाठी बाहेर पडावे किंवा रूचिपालट म्हणून क्वचित नागरी जीवनापलीकडील ग्रामीण विश्वाची दखल घेण्यासाठी परंतु हे पडलेले अंतर कमी करण्यासाठी खांडेकरांसारखे लेखक खेड्याकडे वळले रामतनयांसारख्या लेखकांनी 'मोहित्यांची मंजुळा','खरा उध्दार', 'प्रमिला बेन' सारख्या काही कादंबरीतून ग्रामीण चित्रीत केलेले दिसते. वरेरकरांची 'फाटकी वाकळ'ग.ल.ठोकळ 'गावगुंड'श्री.हडपांची 'अन्नदाता उपाशी'ना.के. महाजन 'विनाश' शिरवाडकरांची 'वैष्णव'श्री. पेंडसे यांची 'हद्‌दपार'या कादंबरीमध्ये ग्रामीण पार्श्वभूमी दिसते. श्री.र.वा दिघे यांची 'पाणकळा' (१९४०) 'सराई'(१९४३) ग्रामीण पार्श्वभूमीवर कल्पनारम्य कथाबीजांची पेरणी केली. म.भा.भोसल्यांची

'समरांगण' 'एका आईची लेकरे'श्री. चिंदरकर यांची 'महापुर'(१९४२) या कादंबरीतून ग्रामीण जीवनाच्या समस्यांची चर्चा दिसते. हौसेने ग्रामीण जीवनावर कांदबरी लिहिणाऱ्या प्रारंभीच्या लेखकांची दृष्टी दुरत्वाची होती. मराठी कादंबरीचे दुसरे शतक प्रारंभ झाल्यावर उठावदारपणे संवादाची भाषा ग्रामीण चालीरिती अर्थ व्यवस्था राजकारण याचे दर्शन होवू लागले. गो.नी. दांडेकर 'पडघवली'(१९५५) 'पूर्णामायची लेकरं'(१९५६) र.वा.दिघें यांची 'आई आहे शेतात' (१९५७) व्यंकटेश माडगूळकर यांची 'बनगरवाडी '(१९५५) मधुमंगेश कर्णिक 'देवकी' (१९६३) जयवंत दळवी 'सारे प्रवासी घडीचे' (१९६४) अण्णाभाऊ साठे 'रानगंगा' डॉ. रंगनाथ देशपांडे 'वेडी बाभळ '(१९६५) इ. कादंबरी उल्लेखनीय आहेत. मराठी कादंबरी ग्रामीण जीवनाकडे वळल्यानंतर कादंबरीच्या व्दारे प्रादेशिक वैशिष्ट्य दाखविण्याचा प्रयत्न दिसून येतो. 'प्रादेशिक कादंबरी ही वस्तुत: वास्तववादी कादंबरीलाच फुटलेला एक धुमारा आहे असे मत ना.सी.फडकेंनी व्यक्त केले'. वसंत कानेटकरांच्या 'घर ''पंख' अत्यंत सुक्ष्म सखोल व परिणाम कारक मुंबईच्या यांत्रिक धावपळीत निर्वासितासारखी कशी असहाय्य अवस्था होते याची जाणीव विदारकपणे करून कादंबरी लेखणाच्या एका अभिनव तंत्राचा प्रयोग केल्याने ही कांदबरी उत्कृष्ट आहे असे वाटते. गो.नी.दांडेकरांच्या कादंबरी लेखणात उत्क्रांती जावणते. 'शितू '(१९५३) 'तुडवलेले घरकुल' (१९४८) 'सिंधू कन्या' (१९४९)शालेयजगापासून बोधपरायण कथांपासून चिरमधुर प्रेम कथेच्या कथानिर्मितीचा विकास विलोभणीय वाटतो. 'शितू' कादंबरीमध्ये प्रादेशिकतेचे दर्शन घडते. श्री.ना. पेंडसे 'एल्गार' (१९४७) 'हद्दपार' (१९५०) 'गारंबीचा बापू '(१९५१) या तीन कादंबरीतून कोकण प्रदेशातील निसर्ग ,सामाजिक जीवन, त्यांचे घटक असलेल्या व्यक्ती, माणुसकीची व्यापक जाणीव, सामान्यशिक्षकाचे जीवन हे सर्व असामान्य कौशल्याने दाखविले. श्री. व्यंकटेश माडगूळकर यांनी 'बनगरवाडी' (१९५५) माणनदीच्या परिसरातील आटपाडी दुष्काळी तालुका 'मेंढपाळाचे विश्व' आदर्शवादी 'शिक्षकाचे विश्व' याचे ह्दयस्पर्शी चित्रण केले आहे. रा.वि. जोशींची 'रानभूल' (१९६३) वि.शं.पारगावकरांची 'कालचक्र' (१९६७) मधुमंगेश कर्णिकांची 'भावीण' कोकणचे जीवन साकार करून, चालीरितींचे दर्शन घडविणारी या कादंबरी होत.

मराठी कादंबरीची व्याप्ती वाढण्याचे कारण म्हणजे समाजातले भिन्न भिन्न पातळीवर जीवनाचे चित्रण कादंबरीत केले. काही कादंबरीत शेतकरींच्या जीवनाचे चित्र मिळाले. मराठी भाषेत आदिवासी लोकांच्या जीवनातील घटनांवर कादंबरी लिहिली गेली. शं.रा.भिसे यांच्यातील 'जंगलातील छाया' श्रीराम उत्तरपदे यांची 'सावलीच्या उन्हात' बा.भ.कर्णिक 'वाडगीण 'याकादंबरी उल्लेखनीय आहेत. परभाषेतील कादंबऱ्यांनी मराठी वेश घातलेला दिसतो. बंगाली कादंबरी यांची भाषांतरे मराठीत केली. बंकिम, शरच्चंद्र चटर्जी व रवीद्रनाथ ठाकूर यांच्या कादंबरीचा मराठी लेखकांना मराठीत झाल्यामुळे कादंबरीच्या विकासावर प्रभाव पडला. महायुद्धानंतर भाषांतराला महत्व निराळ्याद्दष्टीने आले. परदेशातील संस्थानी लेखकांना भाषांतर करण्यास प्रोत्साहन दिले. लोकसाहित्य प्रकाशन संस्थेतर्फे काही कादंबरी भाषांतरीत झाल्या 'कोसलरची' 'डार्कनेस इन द नन' (भर दुपारच्या अंधारात) 'महात्मा की मोहात्मा' ('थॉय आनातील फ्रान्स') जंगल 'ॲप्टन सिंकलेर' ('धरित्री') 'गुड अर्थ पर्ल बक' (पंकज) 'शिन यूटांग' (तेथे चल राणी) 'द चिप्स आर डाउन्न' या कादंबरी उल्लेखनीय आहेत. (एका कोळीयाने) पु.य.देशपांडे अर्नेस्ट 'हेमिग्वच्या द ओल्ड मॅन ॲन्ड सी' ('चोरावर मोर') 'देन ॲन्ड नॉऊ मॉम' तंत्रद्दष्टया मराठी कादंबरीवर नवीन प्रयोग होत राहीले. भारतीय भाषामध्ये सर्वात जास्त अनुवाद बंगाली भाषेतील कादंबरींचे झालेले दिसते. वि.सी.गुर्जर, वा.गा.आपटे आणि वरेरकर यांनी खुपच काम केले.बंकिमचंद्रांच्या 'आनंद मठ' चा अनुवाद 'भाऊ श्रीधर कुलकर्णी '(१९२३) मध्ये केला. वा.गो.आपटे यांनी 'संपुर्ण बंकिमचंद्र' चार खंडात प्रसिध्द केला. रविंद्रनाथ टागोरांच्या 'A story of four chapters' या इंग्रजी पुस्तकावरून शि.गो. भावेंनी 'चौघांच्या चार तऱ्हा' हा अनुवाद केला. शरदच्चंद्रांच्या साहित्याचे अनुवाद विपुल प्रमाणात झाले. भा. वि. वरेरकरांनी 'देवदास', 'चंद्रनाथ गावगंगा', 'भैरवी', 'विजया', 'बिराजवहिनी' इ. जैनेन्द्रकुमार जैन परख (त्यागपत्र) प्रेमचंद (गोदान) राहुल सांकृत्यायन (सिंहसेनापती) भगवतीचरण वर्मा (चित्रलेखा) रामानंद सागर (और इन्सान मर गया) यशपाल (पूरोची कहाणी)इत्यादींनी अनेक उत्कृष्ट कादंबरीकारांच्या कृतीची भर मराठी कादंबरी वाड्:मयात घातली.

मराठी कादंबरीमध्ये विनोद वाङ्‌मयाची परंपरा जुनी असून श्रीपाद कोल्हटकर (पांडूतात्या) चि.वी. जोशी (चिमणराव) रा.ग.गडकरी (बाळकराम) यांच्यामुळे वाचकांचे मनोरंजन झाले. विनोदाचे आचार्य प्र.के. अत्रे पु.ल.देशपांडे यांनी काही कादंबरी लिहिल्या. सहस्त्रबुध्दे व भाई ऐतिवडेकर या दोघांनीमिळून 'जीवनसाथी' (१९५०) ही कादंबरी लिहिली. स्त्री पत्रांची भाषाशैली लेखिकांना अधिक सुलभपणे साधु शकते. पु.भा. भावे यांनी 'अकुलीना' व श्री.पु.शि.रेगे यांनी 'सावित्री' कादंबरी एकतर्फी पत्रांनी कथानकाचा विकास दाखविला आहे. वि.वा.हडपांची 'वादळ' कादंबरी यशस्वी असून तत्कालीन राजकारणाचे प्रवाह अंतरंग परस्पर संबंध यावर प्रकाश टाकलेला दिसतो.

लेखकांनी कादंबरीच्या अनेक पध्दती समन्वय रचना प्रकार, तंत्र, घटकांचा उपयोग करून जीवनानुभव प्रभावीपणे उतरवण्यासाठी आत्मनिवेदनपर लेखण पध्दतीचा वापर केलेला दिसतो. 'अभागिनीची डायरी' यांच्या आधारावर 'दोन पात्रांची रोजनिशी' ना.धो.उपाध्ये यांच्या 'निखारा' मध्ये आढळते. एका पात्राला महत्व देऊन आत्मवृत्ताच्याधारे भावानुभव व्यक्त करताना 'क्रौचवध' मध्ये 'सुलोचना' आढळते. मराठी कादंबरीच्या बाह्यरूपामध्ये फरक दिसू लागला. 'मी' 'धावता धोटा' 'आई आहे शेतात' हे युग संपुष्टात येवून लघु कथांची लोकप्रियता वाढत असल्याचे दिसते. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात फ्राईड, ॲण्डलर, जंग आदि मानसशास्त्र वेत्यांनी केलेल्या संशोधन मनोविश्लेषणाला धार आली. अतंमर्नाचा मागोवा घेताना शास्त्रीय सत्यावर प्रकाश पडल्याने लेखकांनी अनुभव विश्वाचे ओळख कथासाहित्याच्या व्दारे करून दिली. स्वभावरेखनाच्या दृष्टीने मनोविश्लेषणास महत्व आल्याने पु.य.देशपांडेंची 'सुकलेले फुल' शिरूरकरांची 'हिंदोळ्यावर' या कांदबरीमध्ये क्रांतीची पुर्व चिन्हे व तिचे परिणत व आकर्षक स्वरूप दिसते. वैवाहिक जीवनातील असमाधान व्यक्त करण्यासाठी कादंबरीत स्त्री-पुरूषामधील आकर्षण वाढले. नैतिकमुल्ये बदलून कलाविलास, वास्तवता, मनोविश्लेषणाच्या नावाखाली अश्लिलता, तरूण लेखकांनी चित्रीत केली. 'झपुर्झा' 'भावनेच्या भोवऱ्यात' 'चंपी आणि मोत्या' यांची निकृष्ट कादंबरी पहावयास मिळतात. ग.त्र्यं. माडखोलकरांच्या ख्यातनाम लेखकांने 'डाक बंगला' पु.य.देशपांडे 'काळी राणी' इ. कादंबरींनी संयम ठेवलेला दिसत नाही.

कादंबरीच्या विकासातील दुसऱ्या टप्प्यामध्ये विश्राम बेडेकरांची 'रणांगण' (१९३९) बा.सी.मर्ढेकर 'रात्रीचा दिवस' (१९४०) या कृतींवर हेन्री जेम्स, मार्सेल प्राऊस्त, डोरॉथी रिचर्डसन, जॉईस इ. लेखकांच्या तंत्रांचा प्रभाव दिसतो. मर्ढेकरांनी 'तांबडी माती' (१९४३) 'पाणी' (१९५१) द.र.कवठेकरांची 'आभाळाची सावली' (१९४५) यामध्ये तंत्राचा कलात्मकपणे वापर केलेला दिसतो. संज्ञाप्रवाही निवेदन पध्दतीचा अवलंब करून मानसीक व अंर्तमनातील प्रतिबिंब उमटवण्याचा प्रयत्न श्री.ज.जोशी यांनी 'आनंदीगोपाळ' (१९६८) मनोहर शहाणे यांची 'झाकोळ' (१९६५) भाऊमाध्ये यांची 'वैतागवाडी' चि.त्र्य. खानविलकरांची 'अजगर'(१९६५) पेंडसे 'रथचक्र' इ. विविध प्रकारच्या कांदबरीमध्ये सापडतात. प्रा.नेमाडे यांची 'कोसला' ही कादंबरी मनोविश्लेषनाला सोईस्कर अशा आत्मनिवेदन पध्दतीचा अवलंब कथानकाच्या विकासासाठी केलेला दिसतो. गंगाधर गाडगीळांची 'लिलीचे फुल' खांडेकरांची 'अमृतवेल' पु.भा.भावे यांची 'वर्षाव 'उध्दव शेळकेंची 'बाईसाठी बुवा' हमीद दलवाई यांची 'इंधन' या कादंबरी मनोवृत्तीवर भर दिल्याने इतर घटक दुर्लक्षीत झालेले दिसतात.

'कादंबरी' हा एक अतिशय लोकप्रिय वाङ्:मय प्रकार विविध प्रकारांनी वाढलेला दिसतो. १८५७ मध्ये 'यमुनापर्यटन' ही पहिली सामाजिक कादंबरी, १८६२ मध्ये 'मुक्तामाला' कल्पनारम्य, १८६७'मोचनगड' ऐतिहासिक, कादंबरीची संख्या नंतरच्या कालखंडात वाढली राजकीय, पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक, व्यक्तिचित्रणात्मक, ग्रामीण, कल्पनाप्रधान, प्रादेशिक, मनोविश्लेषणात्मक संज्ञाप्रवाहित अशा बहुविध प्रकाराने कादंबरी विखुरली गेली. हरिभाऊ वा.म.जोशी, ना.सी.फडके यांच्या परंपरेतील आजची कादंबरी नसून त्यामध्ये सामाजिक जीवनाचे प्रतिबिंब पडल्याने समाजाभिमुख असून जुनी मुल्ये मागे पडली व व्यक्तिनिष्ट बनलेली दिसते. संख्यात्मक वाढ कादंबरीचा विस्तार दर्शवत असली तरी गुणात्मक विकासाने परिपूष्ट झालेली दिसते. ह.ना.आपटे, जोशी, फडके, खांडेकर, वरेरकर यांच्या कादंबरीतून प्रत्ययास येते. 'रणांगण' 'बळी' 'थॅंक यु मिस्टर ग्लाड 'अशा कलाकृती मानदंड ठरल्या.१८७३ मध्ये 'साळूबाई तांबवेकर' या एकच स्त्री कादंबरीकार होते. त्यानंतर स्त्रीशिक्षणाचा प्रसार झाल्याने आत्मविष्कारासाठी नियोदित लेखिका मालतीबाई दांडेकर, सुमतीक्षेत्रमाडे इ. लेखिका

पुढे आल्या. मराठी कादंबरी विविध शाखांमध्ये बहरताना रणजित देसाई, रा.श.देसाई, नाथमाधव, गो.नी. दांडेकर, ब.मो.पुरंदरे याशिवाय 'ययाती' सारखे पौराणिक कादंबरीने मराठी सारस्वताला 'ज्ञानपीठ' पुरस्कार मिळवून दिला. 'सराई' 'माहीमची खाडी', 'माझा गाव' या दुर्लक्षीत मानवी जीवन कादंबरीत अधोरेखित झालेले दिसते. कादंबरीच्या अंगी इतर वाड्:मय प्रकाराच्या मानाने फार मोठ्या प्रमानावर जीवन दर्शन घडविण्याचे सामर्थ्य दिसते. व्यक्ति आणि समाज यांचा प्रत्ययकारी चित्रण व्यापक मानवतावादी विचार सरणी दिसते.

**निष्कर्ष :-**

'कादंबरी' हा अतिशय लोकप्रिय वाङ्मयप्रकार असून दिडशे वर्षामध्ये ती शाखोपशाखा मध्ये बहरून गेलेली दिसते. 'यमूनापर्यटन' ही पहिली सामाजीक कादंबरी (१८५७) ला प्रसिद्ध झाली. भाषांतरित कादंबरीपासून मराठी कादंबरीला सुरूवात झाली. भाषांतरीत स्वरूपाची असली तरी तिने स्वत:चे नवे रूप धारण केले. तिला वेगवेगळ्या अवस्थेतून जायला लागले. अद्भूतरम्य वातावरणाची या काळातील लोकप्रिय कादंबरी म्हणजे लक्ष्मण मोरेश्वर हळबेंची 'मुक्तामाला', 'मंजुघोषा', 'मोचनगड' ही गुंजीकरांची ऐतिहासिक कादंबरी आहे. त्याचप्रमाणे १९७० मध्ये 'विचित्रपूरी' कादंबरीमध्ये आपले रूप प्रकट केले. वास्तववादी परंतु एकदम वास्तववादी न बनता मधे काही तो ऐतिहासिक कथेच्या रमणीय प्रदेशात रमली. आजच्या कादंबरीचे स्वरूप 'मंजूघोषा' 'मुक्तामाला' सुरूवातीच्या कादंबरीहून अगदी भिन्न आहे. हरिभाऊ आपटे, ना.ह.आपटे, वा.म. जोशी, केतकर यांच्या सारख्या प्रथमश्रेणीच्या कादंबरीकारांनी मोलाची कामगीरी केली. प्रा.फडके यांनी 'कलेकरीता कला' या जीवनमूल्यांचा हिरिरीने पुरस्कार केला. वि.स.खांडेकरांनी मराठी कादंबरीला तात्विक अधिष्ठान प्राप्त करून दिले. श्री. पु.य. देशपांडे, विभावरी शिरूरकर किंवा गीतासाने यांनी कादंबरीच्या क्षेत्रात पारंपारिक बंधने तोडून पलिकडे जाण्यास प्रवृत्त झाली.

तत्कालीन समाजाचे सत्यदर्शन घडविणे समान दु:खाना वाचा फोडणे गरजेचे वाढू लागले. १९२० नंतर कादंबरी क्षेत्र विस्तारले कादंबरी सदाशिवपेठी वातावरणातून बाहेर पडली. औद्योगिक क्रांतीचे परिणाम जे समाजव्यवस्थेवर झाले, कुटूंबव्यवस्थेवर झाले. त्यांचेच प्रतिबिंब

कादंबरीत उमटले. १९३० ते ३५ च्या कालखंडामध्ये बहुसंख्य कादंबरीकारांचे लेखनदर्श फडके, खांडेकर, माडखोलकर हे होते. स्त्री आणि तिचे जीवन, समस्या यावर स्त्रिया कादंबरी लेखन करू लागला. स्वातंत्र्योत्तर काळात मराठी कादंबरीत अनेक नवेनवे प्रवाह निर्मान झाले. लेखक ज्या प्रदेशामध्ये जगला, वाढला, जी माणसे त्याने जवळून पाहिले ती सर्व साहित्यात येऊ लागले. त्यानंतर पौराणिक, ऐतिहासिक, चारित्रात्मक, कादंबरीला सुरूवात झाली. स्वातंत्र्योत्तर काळात व्यस्ततावादी, वास्तववादी कादंबरीचा जन्म झाला. वास्तववाद अंगीकारून नवी आशयद्रव्ये निवडून दबलेल्या, दडपलेल्या थरातील लोकांना लेखकांनी जाग आणून लेखन होऊ लागले. सर्वसामान्य माणूस हा त्यांचा केंद्रबिंदू आहे.

# संदर्भ सूची


१) भटकळ ग.रा. वाङ्‌मयीन संज्ञा-संकल्पना कोश, (कादंबरी.)
हर्ष भटकळ, जी.आर.भटकळ.
फाऊण्डेशन ३५/ सी.पं.मदन.
मोहन मालवीय मार्ग,
मुंबई ४०००३४.
पृष्ट १७०.

२) फडके भालचंद्र प्रदक्षिणा खंड पहिला.
कॉन्टिनेन्टल प्रकाशन,
पुणे ३०.
पुनर्मुद्रणे : २००२.
पृष्ट २०२.

३) वाङ्‌मयीन संज्ञा-संकल्पना कोश, कादंबरी, उ. नि. पृ.१७३.

४) बापट प्र.वा.व.गोडबोले ना.वा. मराठी कादंबरी (तंत्र आणि विकास)
व्हीनस प्रकाशन,शनिवार पेठ, पुणे ३०.
व्दितीय आवृत्ती १९५७.
पृष्ट ८७.

५) तत्रैव, पृष्ट ९४.

६) वाङ्‌मयीन संज्ञा संकल्पना कोश, कादंबरी, उ. नि. पृष्ट १७४.

७) मराठी कादंबरी (तंत्र आणि विकास) उ. नि.पृष्ट ११२.

८) तत्रैव, पृष्ट ११७.

९) वाङ्‌मयीन संज्ञा संकल्पना कोश, कादंबरी, उ. नि. पृष्ट १७५.

१०) तत्रैव, पृष्ट १७६.

११) तत्रैव, पृष्ट १८२.

१२) मराठी कादंबरी (तंत्र आणि विकास) उ. नि. पृष्ट १५२.

१३) डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर — मराठी कादंबरीचा इतिहास,
मेहता पब्लिकेशन,
व्दितीय आवृत्ती ऑक्टोबर, १९९६.
पृष्ट १०४.

१४) तत्रैव, पृष्ट १०६.

१५) मराठी कादंबरी (तंत्र आणि विकास) उ. नि. पृष्ट १७१.

१६) तत्रैव, पृष्ट १७१.

१७) वाङ्मयीन संज्ञा – संकल्पना कोश, कादंबरी उ. नि. पृष्ट १८३.

१८) मराठी कादंबरीचा इतिहास, उ. नि. पृष्ट ११२.

१९) भटकळ ग.रा. — वाङ्मयीन संज्ञा – संकल्पना कोश, कादंबरी
हर्षभटकळ, जी.आर.भटकळ.
फाऊण्डेशन ३५ /सी.पं.मदन मोहन मालवीय मार्ग,
मुंबई ४०००३४.
पृष्ट १८५.

२०) बापट प्र.वा.व गोडबोले ना.वा. — मराठी कादंबरी (तंत्र आणि विकास)
व्हीनस प्रकाशन, शनिवार पेठ पुणे,३०
व्दितीय आवृत्ती १९५७.
पृष्ट १८२.

२१) डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर — मराठी कादंबरीचा इतिहास.
मेहता पब्लिकेशन्स.
व्दितीय आवृत्ती, आक्टोबर १९९६ पृष्ट ६५.

२२) मराठी कादंबरी (तंत्र आणि विकास) उ. नि.पृष्ट १९३.

२३) वाङ्यीन संज्ञा संकल्पना कोश, कादंबरी पृष्ट १८५.

15391

२४) तत्रैव, पृष्ठ १८६.

२५) मराठी कादंबरीचा इतिहास – बांदिवडेकर उ. नि. पृष्ठ ९३.

२६) डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर — मराठी कादंबरीचा इतिहास.
मेहता पब्लिकेशन्स,
व्दितीय आवृत्ती, ऑक्टोबर, १९९६ पृष्ठ
९५.

२७) भटकळ ग.रा. — वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश, (कादंबरी)
हर्ष भटकळ, जी. आर. भटकळ.
फाऊण्डेशन ३५/सी.पं. मदन मोहन
मालवीय मार्ग, मुंबई ४०००३४ पृष्ट १८६.

२८) बापड प्र. वा. व गोडबोले ना. वा. — मराठी कादंबरी (तंत्र आणि विकास)
व्हीनस प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे ३०
व्दितीय आवृत्ती १९५७.
पृष्ट १९६.

२९) तत्रैव, पृष्ठ १९८.

३०) तत्रैव, २०१.

३१) तत्रैव, २०२.

३२) तत्रैव, २०२.

३३) तत्रैव, २०७.

३४) तत्रैव, २०७.